# पुणे महानगरपालिका

## सन २०१८-१९

## महापालिका आयुक्त यांचे निवेदन

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

माझे पुणे महानगरपालिका प्रशासकीय कारकिर्दितील चौथे अंदाजपत्रक सादर करण्याची मला जी संधी प्राप्त झाली, त्याचा मला आनंद होत असून त्याबद्दल मी आपल्या सर्वाचे आभार मानतो. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसमावेशक अंदाजपत्रकाची आवश्यकता असते. पुणे शहरासारख्या आधुनिक व प्रगतीशील शहरासाठी अंदाजपत्रक हा एक परिणामकारक व आर्थिक नियोजनाचा मार्ग निर्माण करणारा असायला हवा. अंदाजपत्रकामुळे आपणास संपूर्ण वर्षाचे आर्थिक समायोजन करुन पुणे शहरास सर्व पातळयांवर प्रगतीपथावर नेण्याची संधी आहे. आर्थिक बाबींची शिस्तबद्ध शिकस्त करुन विकासाचे शिखर गाठावयाचे आव्हान पेलविण्याची क्षमता पुणे शहराची आहे. वाढत्या शहरीकरणा बरोबरच पुणे शहरात नव्याने समाविष्ट झालेली गावे या सर्वांचा विचार करुन सर्व स्तरातील पायाभूत सुविधांचा सर्वसमावेशक विकास होण्याची आवश्यकता आहे. शहरवासियांचे जीवनमान उंचाविण्या बरोबरच शहराच्या गुंतवणूकीमध्ये वृध्दी होऊन मजबुत अर्थव्यवस्था होण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी अंदाजपत्रकाची भूमिका महत्वाची ठरत असते. या तीनही बाबींची सांगड घालण्याचा प्रयत्न अंदाजपत्रक तयार करताना केला गेला आहे.

प्रत्येक आस्थापना म्हणजेच देश, राज्य, महानगरपालिका व अन्य शासकीय संस्थांना अंदाजपत्रक सादर करावे लागते आणि त्या अंदाजपत्रकाचे दृष्य-अदृष्य, अनुकूल-प्रतिकुल परिणाम आपणास पाहावयास मिळतात. पुणे शहरासारख्या जागतिक व देशाच्या पटलावर अग्रेसर असलेले ऐतिहासिक, शैक्षणिक व इतर विविध पैलूंचा वारसा लाभलेल्या शहराकडे सर्वजण ध्येयपूर्तीसाठी आकर्षित होत असतात. त्यामुळे पुणे महानगरपालिकेकडे पाहण्याच्या दृष्टीकोन व अपेक्षांचे ओझे याचा सारासार विचार करणे क्रमप्राप्त असते. या सर्व गोष्टी विचारात घेऊनच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

Digital India व Digital Maharashtra या केंद्र व राज्य शासनाच्या महत्वकांक्षी कार्यक्रमास अनुसरुन प्रशासकीय पातळीवर त्याची परिणामकारक अंमलबजावणी माहिती व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ई-गर्व्हनन्सचा जास्तीतजास्त वापर करुन नागरिकांशी संबंधित आर्थिक व्यवहार Cashless करणे, आधारकार्ड Link करणे आणि सार्वजनिक सेवा वितरण सुधारणे व त्या उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि प्रशासकीय सेवासुविधा जास्तीत जास्त लोकाभिमुख करुन उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात आला आहे.

**मागील चार वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा**

| **जमा बाजू** | **डिसेंबर २०१४ अखेर** | **डिसेंबर २०१५ अखेर** | **डिसेंबर २०१६ अखेर** | **डिसेंबर २०१७ अखेर** |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | ७८८.०२ | ११३४.८३ | १०५१.७४ | ६३५.६६ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ० | ० | ० | ८२३.८० |
| मिळकतकर | ४९९.४६ | ५६९.७८ | ८९८.६० | ६०७.४७ |
| पाणीपट्टी | १२४.९ | १३९.७२ | ३५.४९ | १४९.५६ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ५१३.२४ | ५७५.०८ | ४०२.०५ | ३२९.१२ |
| इतर जमा | ३७८.१८ | ४८०.२३ | २१७.८७ | २९८.३६ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ० | ० | ० | ३९.९० |
| शासकीय अनुदान | ० | ३३.४४ | १२.४१ | ७९.३९ |
| कर्जरोखे | ० | ० | ० | २००.०० |
| **एकुण रक्कम रूपये** | **२३०३.८** | **२९३३.०८** | **२६१८.७४** | **३१६३.२६** |

| **खर्च बाजू** | **डिसेंबर २०१४ अखेर** | **डिसेंबर २०१५ अखेर** | **डिसेंबर २०१६ अखेर** | **डिसेंबर २०१७ अखेर** |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ६७३.१३ | ८०२.०३ | ७४३.२२ | ११६३.२७ |
| प्राथमिक शिक्षण | १३३.९५ | ० | १०७.६४ | **०** |
| वीजखर्च व दुरूस्ती | १०८.४ | ८०.४६ | १११.०६ | १४३.५१ |
| पाणीखर्च | १०.९१ | १२.०९ | ७.५७ | १३.९८ |
| कर्जपरत फेड, व्याज व घसारा | ३६.९१ | ३९.८४ | ३५.५१ | १२.७१ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ५०.१२ | ५३.६३ | ६९.७० | ६०.३५ |
| देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | २५८.८३ | २९५.२६ | २८७.१३ | ३०९.३५ |
| वॉर्डस्तरीय कामे | २.६३ | २.२२ | ४.४२ | १.३३ |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाचे कामे (नॉन प्लॅन) | ५.१२ | ६.११ | १८.४३ | ०.४० |
| भांडवली व विकासाची कामे | ४६१.८८ | ५२९.७७ | ४९८.३५ | ५३२.२३ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ७६.२१ | ९१.५५ | ५१.८४ | ६५.०३ |
| **एकुण रक्कम रूपये** | **१८१८.०९** | **१९१२.९६** | **१९३४.८७** | **२३०२.१६** |

# विकास योजना प्रगती आढावा:–

## (१) पाणी पुरवठा (भांडवली तरतूद र. रु.४९२.९६ कोटी + महसूली तरतूद र.रु. ४११.६२ कोटी = ९०४.५८ कोटी)

**सन २०१७–१८**

- सन २०१७–१८ सालासाठी मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु.३३८.६५ कोटी व भांडवली कामासाठी र.रु.७०६.२२ कोटी असे एकुण र.रु.१०४४.८७ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीचे अनुषंगाने सन २०१७–१८ सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु.१५०.६७ कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते. त्या अनुषंगाने दि. ३१/१२/२०१७ पर्यत पाणीपट्टीपोटी र.रु.६६.२५ कोटी जमा झालेले आहे.

**सन २०१७–१८ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नावीन्यपूर्ण योजना/प्रकल्प**

- पुणे शहरास २४ X ७ पाणीपुरवठा करणेसाठी माहे जानेवारी २०१७ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरच्या निविदा रद्द करुन जीएसटी मुळे झालेल्या दरपत्रकानुसार निविदा मागविण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदरच्या निविदा दि. २२/०१/२०१८ रोजी दाखल होणार आहेत. यापूर्वी समान पाणी वाटप योजने अंतर्गत ८२ साठवण टाक्या बांधण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे व ही कामे प्रगतीपथावर आहेत. ८२ साठवण टाक्यांपैकी ५० साठवण टाक्यांची कामे माहे ऑगस्ट २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, उर्वरीत साठवण टाक्या दि. ३१/०३/२०१९ पर्यत पूर्ण करण्यात येणार आहेत. साठवण टाकी बांधण्याच्या कामाकरीता केंद्र शासनाच्या अमृत योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- २४ X ७ योजना राबविणे, पाण्यासाठी साठवण टाक्या बांधणे, जलवाहिनी टाकणे, मीटर बसविणे इत्यादींचा समावेश आहे.
- पुणे शहरासाठी १००% बंद नळातून पाणी उचलण्याच्या दोन टप्प्या मधील पर्वती जलशुध्दीकरण केंद्र ते लष्कर जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत २२०० मि.मि. व्यासाची दाबनलिका टाकण्याचे काम माहे एप्रिल २०१८ मध्ये पूर्ण करुन कार्यान्वित करण्यात येणार आहे. तसेच पर्वती येथील ५०० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र माहे एप्रिल २०१८ मध्ये पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. पुणे शहराच्या पूर्व भागात असलेल्या वडगांवशेरी, खराडी, चंदननगर इत्यादी भागासाठी भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याचे काम सुरु आहे. एकुण ०६ घटकांपैकी ०५ घटकांची कामे चालू असून, सदरची योजना दि. ३१/१२/२०१८ पर्यत पूर्ण करुन कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.
- पुणे शहरासाठी २४ X ७ पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर खालील फायदे मिळणार आहे.
  १. पाण्याची अनावश्यक साठवणूक व पर्यायाने पाण्याचा अपव्यय थांबविता येणे शक्य आहे. तसेच दुषित पाण्याची शक्यता राहणार नाही.
  २. योग्य आकाराच्या पाणीपुरवठा झोनमुळे चांगल्या दाबाने पाणीपुवठा होऊन ग्राहकांचे समाधान होईल.
  ३. पाण्याची गळती शोधणे व दुरूस्त करणे सोईचे होईल. सध्याच्या ४०% पाणी गळतीचे प्रमाण १५% पर्यंत नियंत्रीत करणे शक्य होणार आहे.
  ४. पाण्याच्या खपाप्रमाणे बिल पध्दतीमुळे वॉटर ऑडिट व वाया जाणाऱ्या पाण्याचे अचुक प्रमाण ठरविणे शक्य होईल.
  ५. जादा पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

६. ए.एम.आर. प्रकारच्या पाण्याच्या मिटरमुळे अचूक पाण्याची मोजणी व मानवी हस्तक्षेप कमी होणार आहे.

७. स्काडा पध्दतीमुळे शहरातील वितरण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

- पुणे शहरामध्ये २४ X ७ ची योजना राबवितानाच त्यासोबत Optical Fibre टाकण्यासाठी पायाभूत सुविधा (Infrastructure) निर्मित करण्यात येत आहे. Optical Fibre Infrastructure वापरण्यासाठी Optical Fibre Network चे धोरण तयार करण्याचे काम हाती घेण्यात येत असून त्याची अंमलबजावणी लवकरच होणार आहे. यामुळे पुणे शहरात Digital Economy च्या क्षेत्रात मोठयाप्रमाणात वाढ होणार आहे. यामुळे शहराच्या एकूण G.D.P. मध्ये सुध्दा मोठयाप्रमाणात वाढ होणार आहे.

## (२) मलनि:सारण (भांडवली तरतूद र. रु.७८.१६ कोटी + महसूली तरतूद र.रु. १५१.०७ कोटी = २२९.२३ कोटी)

**सन २०१७–१८**

**मलवाहिनी**

- पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नदी व नाल्यामधून उघड्यावर वाहणारे मैलापाणी नजीकच्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहचविण्याबाबत मे. राष्ट्रीय हरित लवाद यांनी दावा क्र. (३७/२०१६ व ५५/२०१५ अन्वये आदेश दिला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने मे. राष्ट्रीय हरित लवाद यांनी नदीतील पाण्याचे प्रदुषण तपासण्यासाठी आय.आय.टी. मुंबई यांची नियुक्ती केलेली आहे. आय.आय.टी. मुंबई यांनी सविस्तर अहवाल सादर केला असून त्यांनी केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने नाल्यामध्ये मलवाहिन्यांची कनेक्टीव्हिटी करणे, मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या टाकणे या कामांसाठी र.रू ५७.०० कोटीचे पूर्वगणनपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या आहेत.
- सदर कामामध्ये ४५० मि.मी. ते १६०० मि.मी. व्यासाच्या सुमारे ५१ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या विकसित करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

**मैलापाणी शुद्धीकरण योजना**

- पुणे शहरामधील संपूर्ण मैलापाणी शुध्दीकरण करणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत र.रु.९९०.०० कोटीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.
- वरील सर्व घटकांचा अंतर्भाव करुन सन २०१४–१५ च्या दरपत्रकानुसार योजनेचे पूर्वगणन र.रु.९९०.०० कोटी एवढे आहे. सदरची योजना जपान सरकारच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणार आहे. योजना प्रत्यक्ष राबविण्यापूर्वी भारत सरकार व जपान सरकार दरम्यान करारनाम्यावर दि.१३/०१/२०१६ रोजी स्वाक्षरी होऊन अंतिम मान्यता देण्यात आली आहे.
- सदरची योजना सहा वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्याचा पुणे मनपाचा मानस आहे. त्यानुसार केंद्र शासनाकडून दोन टप्प्यात एकूण र.रू.२५.९९ कोटी रक्कम प्राप्त झाली आहेत. त्यानुसार केंद्र शासनाची मान्यता घेऊन बाणेर, बालेवाडी परिसरामध्ये मलवाहिन्या टाकणे (Package No.1) या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून निविदेस मा. स्थायी समितीने दि.०७/११/२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनाकडून प्रस्तुत प्रकल्पातील इतर कामांची निविदा कार्यवाहीसाठी मे. पेल फ्रिशमन, लंडन यांची दि.२०/१२/२०१७ रोजी नेमणूक करण्यात आली असून प्रकल्पातील इतर कामे केंद्र शासनाच्या आदेशानुसार करण्याचे नियोजन आहे.

**पुणे महानगरपालिका हद्दीतील मैलापाणी वहन व्यवस्थेबाबत मास्टरप्लॅन तयार करणे व तद्नुषंगिक कामे करणे. (र.रू. २.९८ कोटी)**

- प्रस्तुत कामामध्ये अस्तित्वातील विविध व्यासाच्या मलनि:सारण वाहिन्यांचे सर्वेक्षण करणे, माहिती संकलित करणे व त्याचा अंतर्भाव जीआयएस मध्ये करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.
- तसेच वारंवार तुंबणारी (Chock-up) ठिकाणे, वारंवार साफसफाई करावयाची ठिकाणे, ड्रेनेज लाईन वरील चेंबर्स, त्यांची खोली, मैलापाण्याच्या प्रवाहाची दिशा, इ. माहिती उपलब्ध होणार आहे. पुढील ३० वर्षानंतर होणाऱ्या लोकसंख्येच्या आधारावर (तीन टप्प्याटप्प्याने सन २०२७, २०३७, २०४७) सदरचा आराखडा तयार केला जाईल.
- पुणे शहरातील क्षेत्राची विविध ड्रेनेज डिस्ट्रीक्ट (झोन) मध्ये विभागणी करणे. या विभागामध्ये प्रभागनिहाय माहिती संकलित करणे. लोकसंख्येनुसार प्रत्यक्ष सुवेज डिस्ट्रीक्ट मध्ये निर्माण होणाऱ्या लोकसंख्येनुसार मलवाहिन्याचे हायड्रॉलीक मॉडलिंग करणे. यातून अस्तित्वातील अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्यांची माहिती उपलब्ध होणार आहे. त्यानुसार सदर मलवाहिन्या बदलण्यासाठी तरतूद अंदाजपत्रकात करणे शक्य होणार आहे.

## (३) घनकचरा व्यवस्थापन (भांडवली तरतूद र. रु.८७.०० कोटी + महसूली तरतूद र.रु. ४५०.३२ कोटी = ५३७.३२ कोटी)

### सन २०१७–१८

- रामटेकडी येथे ७५० मे. टन मिश्र प्रकल्पासाठी जागा ताब्यात घेण्यात आली असून प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले आहे. सदरचा प्रकल्प महानगरपालिकेचा महत्वाकांक्षी प्रकल्प असून ११ मेगावॅट विद्युत निर्मिती यामधून होणार आहे.
- वडगाव बुद्रुक येथे १०० मे. टन, हांडेवाडी येथे २५ मे.टन मिक्स वेस्ट प्रकल्प सुरु करण्यात आले.
- संपूर्ण पुणे शहरातील ५ झोन नुसार ३० आधुनिक पद्धतीने (ICONIC) स्वयंचलित शौचालये बांधण्याचे नियोजन असून त्याची निविदा प्रकिया अंतिम टप्प्यात आहे. शौचालये आधुनिक पद्धतीची असून यात IOT (Internet Of Things) बेस सिस्टिमचा समावेश करण्यात आला आहे. स्वयंचलित फ्लशिंग असून या व्यतिरिक्त भरपूर प्रकाश हवा खेळती राहणे या करिता उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
- वाघोली येथील ०.८ हेक्टर खानपडीत जागेत वेस्ट प्रक्रिया उभारणेबाबत प्रकिया सुरु आहे. सदर जागेसाठी राज्य शासनाकडे वेस्ट प्रकिया प्रकल्पधारकास जागा हस्तांतरण करणेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शहरात निर्माण होणारा राडारोडा संकलित करून वाघोली येथे वाहतूक करण्याचे काम जानेवारी २०१८ पासून सुरु आहे.
- संपूर्ण पुणे शहरात महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्यासाठी 'ती बस' योजने अंतर्गत ११ बस ठेवण्यात आल्या आहेत. PMPML कडील सेवा पूर्ण झालेल्या बसेस उपलब्ध झाल्या असून CSR माध्यमातून बसच्या अंतर्गत भागात अत्याधुनिक शौचालय करण्यात आली आहेत.
- वैकुंठ स्मशान भूमी येथे ८ मे. टन क्षमतेचा मॅकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारे खत महानगपालिकेच्या उद्यानाकरिता वापरण्यात येत आहे.
- आदर पुनावाला क्लीन सिटी इनिशिएटीव या संस्थेमार्फत ४००० लिटर्स बिन्स् बसविण्यात आले आहे.

### सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- मौजे फुरसुंगी व उरुळी देवाची येथील नागरिकांनी उरूळी देवाची फुरसुंगी कचरा डेपो बंद करणेसाठी मे. राष्ट्रीय हरित लवाद येथे याचिका दाखल केली असून न्यायालयात दि.१८/११/२०१७ रोजी सुनावणी झाली आहे. या सुनावणीमध्ये कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मे. राष्ट्रीय हरित लवाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार १००० मे. टन प्रतीदिन क्षमतेचा पर्यावरणपूरक बायोमायनिंग

प्रक्रिया प्रकल्प उभारुन निर्माण होणाऱ्या घटकाची विल्हेवाट लावण्याचे सन २०१९ अखेर नियोजन आहे.

- राष्ट्रीय हरित लवाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार ५०० मे. टन क्षमतेची शास्त्रोक्त पद्धतीने लॅंडफिल विकसित करणे व त्याची दैनंदिन प्रक्रिया राबविणेचे नियोजन आहे. तसेच दिशा प्रकल्पाचे ठिकाणी ३०० मे. टन नवीन मिश्रकचरा प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित आहे व उरूळी देवाची येथे ३०० मे. टन नवीन मिश्रकचरा प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित आहे. तसेच शहरात विविध ठिकाणी २५ व ५० मे. टन प्रतीदिन क्षमतेचे मिश्र कचरा प्रकल्प प्रस्तावित आहेत.
- पुणे शहरामध्ये निर्माण होणाऱ्या एकूण कचऱ्यापैकी सुमारे ८०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी EPC (Engineering, Procurement and Construction) तत्वावर प्रकल्प तयार करून त्यासाठी योग्य साधनातून निधी उपलब्ध करून सदरचा प्रकल्प २०१८-२०१९ व २०१९-२०२० या दोन वर्षात पूर्ण करण्याचा मानस आहे.
- इलेक्ट्रॉनिक वेस्ट कलेक्शन सेंटर स्थापित करणे.

## (४) आरोग्य (महसूली तरतूद र.रु.२७६.१५ कोटी)

**सन २०१७-१८**

- पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत सी.एस.आर. अंतर्गत पुणे महानगरपालिका व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. व मुकुल माधव फांऊडेशन यांचे समवेत पुणे महापालिकेच्या १) सोनवणे प्रसुतिगृह २) भारतरत्न स्व.राजीव गांधी रूग्णालय येरवडा ३) कमला नेहरू रूग्णालय ४) डॉ.दळवी प्रसुतिगृह ५) जयाबाई सुतार दवाखाना कोथरूड येथे नवजात अतिदक्षता विभाग विकसित करण्यात येणार आहे व याकामी पुणे महानगरपालिका व फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. व मुकुल माधव फांऊडेशन यांचे समवेत सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.
- **शहरी गरीब योजना –**

  आरोग्य कार्यालयाकडील शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजने अंतर्गत पुणे महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टयांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या व पिवळे रेशनिंग कार्डधारक, एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या गरजू रुग्णांकरीता राबविणेत येत आहे. सदर योजनेअंतर्गत एका आर्थिक वर्षात र.रु.१.०० लाख या कमाल मर्यादेपर्यंत पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटलमधील अंतररुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी ५०% हमीपत्रांतर्गत वैद्यकीय उपचारांमध्ये आर्थिक लाभ देण्यात येतो. या योजने अंतर्गत दि.०१/०४/२०१७ ते १५/०१/२०१८ पर्यंत ९,८०३ रुग्णांनी लाभ घेतला आहे.

**सन २०१८-१९ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजनाची माहिती खालीलप्रमाणे**

- केंद्र शासनाच्या सीआरएस संगणक प्रणालीमध्ये जन्म आणि मृत्युच्या नोंदणीचे संगणकीकरण करणे.
- सर्व जुने रेकॉर्डचे जतन व संगणकीकरण (स्कॅनिंग-बाईंडिंग)
- सर्व चालू जन्म-मृत्यु नोंदी, दत्तक प्रकरण दुरुस्ती यांचेकडील कागदपत्रे संगणकीकरण करणे व जतन करणे.
- सर्व क्षेत्रिय कार्यालयांकडे श्वान वाहने उपलब्ध करुन कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.
- कैलास स्माशानभूमी येथे जैववैद्यकीय कचरा विल्हेवाट प्रकल्प विस्तारीकरण करण्यात येणार आहे.
- शहरी गरीब योजनेअंतर्गत सन २०१७-२०१८ मध्ये राबविण्यात येणारे विविध प्रकल्प हे सन २०१८-२०१९ मध्ये राबविण्यात येणार असून त्याकरीता र.रु.२०.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

- **सिटी हेल्थ प्लॅन** –

पुणे शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा स्तर उंचाविण्याकरीता सेव्ह द चिल्ड्रन या संस्थेसोबत पुणे महानगरपालिकेमार्फत ५ वर्षाचा आराखडा तयार केला आहे. अतिजोखमीच्या गरोदर माता, गुंतागुंतीची प्रसुति, अतिदक्षता आवश्यक असलेले नवजात अर्भक याकरीता चार रेफरल सेंटर करण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत आरोग्य विभागामार्फत खालील पाच रुग्णांलयात एन.आय.सी.यू. (Neonatal Intensive Care Unit) सुरू करण्यात येत आहेत.

१. कमला नेहरू रूग्णालय

२. कै. चंदुमामा सोनवणे प्रसुतिगृह, भवानी पेठ

३. भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय, येरवडा

४. डॉ. दळवी रुग्णालय, शिवाजीनगर

५. कै. जयाबाई नानासाहेब सुतार प्रसुतिगृह, कोथरूड

## (५) नगर नियोजन

### सन २०१७–१८

पुणे मनपा व्यतिरिक्त केंद्र व राज्य शासनाकडील बांधकाम परवानगीशी संबंधित विभाग जसे रेल्वे, पुरातत्व विभाग, नागरी उड्डान विभाग (Airport), संरक्षण विभाग इ. विभागांचे ना हरकत पत्र/ दाखला संगणकीय प्रणालीचा वापर करून ऑनलाईन पध्दतीने मिळणेकामी संगणक प्रणाली विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

- **पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट येवलेवाडी गावाचा प्रारुप विकास आराखडा**

मौजे येवलेवाडी गावाचा प्रारुप विकास आराखडा एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि.२०/९/२०१७ रोजी नागरिकांकडून हरकती व सूचना मागविणेसाठी प्रसिध्द करण्यात आला आहे. प्राप्त हरकतीच्या सुनावणी प्रक्रियेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८ अन्वये नियोजन समिती गठीत करण्याची प्रक्रिया चालू आहे.

- **सॅटेलाईट इमेज**

पुणे महानगरपालिकेसाठी राष्ट्रीय सुदूर संवेदन केंद्र (NRSC), हैद्राबाद यांचेकडून ५० से.मी. रिझोल्युशन असलेली सॅटेलाईट इमेज करणेसाठी र.रु.८,३८,८६८/– इतकी रक्कम आदा करण्यात आली असून त्यानुसार लवकरच सॅटेलाईट इमेज पुणे महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे. सदर इमेज चा वापर अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्यासाठी होणार आहे.

- **एंटरप्राईज जीआयएस ॲप्लिकेशन**

महानगरपालिकेच्या सर्व विभागाच्या व नागरीकांच्या उपयोगाकरीता एंटरप्राईज जी.आय.एस. ॲप्लीकेशन सुरू करण्यात आली आहे. यामुळे विविध विभागांना एकाच मूळ नकाशाशी सुसंगत व आवश्यक नकाशे माहितीसह संकेतस्थळ, इंटरनेट व मोबाईल ॲपवर उपलब्ध होतील. विविध विभागांकडून करणेत येणारी कामे ही एकाच नकाशांवर संबंधित माहितीसह संकलीत झाल्यास त्याचा फार मोठा उपयोग प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत होणार आहे.

- **जोखीम आधारीत परवानगी मंजूरी**

शासनाकडील परिपत्रक दि.२२/८/२०१७ नुसार १५० चौ.मी. (लो रिस्क) व २०० चौ.मी. (मॉडरेट रिस्क) क्षेत्रफळाच्या मिळकतींवर नोंदणीकृत आर्किटेक्ट/नोंदणीकृत इंजिनिअर यांचेमार्फत बांधकाम परवानगी घेण्याबाबत शासन निर्देश प्राप्त आहेत. या अनुषंगाने जा.क्र.२०६६, दि.८/१२/२०१७ नुसार

कार्यालयीन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. या प्रकरणी लो रिस्क कॅटेगरी आणि मॉडरेट रिस्क कॅटेगरीच्या इमारतीची मंजुरी नोंदणीकृत आर्किटेक्ट/ लायसेन्स इंजिनिअर यांचे मार्फत करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहे.

- Trust and Verify या केंद्र शासनाच्या संकल्पनेवर आधारित बांधकाम परवानगी देण्याच्या प्रक्रियेस सुरवात करण्यात आलेली आहेत. त्या अंतर्गत जोखीम आधारीत जलदगती बांधकाम परवानगीचे धोरण निश्चित करुन भूखंड क्षेत्र २०००.०० चौ.मी. पर्यंत व २००० चौ.मी. क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राच्या मिळकतीमधील मान्य लेआऊट मधील इमारतीकरीता आर्किटेक्ट व लायसेन्स इंजिनिअर यांनी बांधकाम परवानगी देण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदरची योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी बांधकाम विकास विभागाकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

## सन २०१८-१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- **पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट ११ गावांचा प्रारुप विकास आराखडा व बांधकाम परवानगी**

  पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये दि.४/१०/२०१७ रोजी ११ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या गावातील मिळकतींबाबत विकसन परवानगी देण्याची प्रक्रिया महानगरपालिकेकडून चालू करण्यात आली आहे. तसेच ११ गावांसाठी विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

- **महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(क) नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना (कंपाऊंडींग स्ट्रक्चर) म्हणून घोषित करणे**

  महाराष्ट्र शासनाचे नगर विभागामार्फत शासन निर्णय क्र.टीपीएस/१८१४/ प्र.क्र.८२/१४/नियम व नवि-१३ दि.७/१०/२०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२(क) नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून ''प्रशमित संरचना'' म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये नियमावली प्रसिध्द केली आहे. सदर नियमावलीनुसार नियमात बसणारी पुणे महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार वसुल करुन प्रशमित संरचना म्हणून घोषित करता येणार आहेत.

- **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश (RTS) खात्याच्या विविध सेवा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देणे**
- शहर अभियंता कार्यालयामार्फत झोन दाखला, भाग नकाशा या लोकोपयोगी सेवा जानेवारी २०१८ पासून ऑनलाईनपध्दतीने पुणे मनपाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच प्रस्तुत सेवा पुणे अर्बन, पी.एम.सी.कनेक्ट या मोबाईल ॲपवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
- **प्रधानमंत्री आवास योजना –**
- प्रधानमंत्री आवास योजना सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही महत्वकांक्षी योजना सुरू केलेली आहे. पुणे शहरातील पात्र लाभार्थ्यांना घरे देण्याचे पुणे महानगरपालिकेचे उदिष्टे आहे. या योजनेचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यामधून परवडणाऱ्या घरांची निर्मिती होणार आहे.
- सदर योजनेतील प्रती सदनिकेसाठी पात्र लाभार्थ्यांना मे. केंद्र शासनाकडून र. रू. १.५० लाख व मे.राज्य शासनाकडून र.रु.१.०० लाख असे एकूण र.रू.२.५० लाख चे अनुदान मिळणार आहे. उर्वरित सदनिकेची किमंत लाभार्थ्यांना भरावयाची आहे.
- पुणे महानगरपालिकेकडून अल्प उत्पन्न गटातील (EWS) सदनिका बांधण्यासाठी हडपसर, खराडी, वडगाव (खुर्द) या परिसरातील एकूण ८ (आठ) सविस्तर प्रकल्प अहवाल मे. शासनाकडे मंजुरीसाठी पाठविले असून त्यामधून एकूण ६,२६४ सदनिका उपलब्ध होणार आहेत. प्रत्येक सदनिकेचे क्षेत्रफळ ३० चौ.मी. पर्यंत आहे. सदर ८ प्रकल्पांचा एकूण खर्च साधारण र.रु.७००.०० कोटी इतका आहे.

सदर योजनेकरिता पुणे महानगरपालिकेकडील सन २०१८-२०१९ चे अंदाज पत्रकात र.रू.४०.०० कोटींची तरतूद केलेली आहे.

## (६) वाहतूक नियोजन व प्रकल्प (भांडवली तरतूद र. रु.२५२.०९ कोटी + महसूली तरतूद र.रु. ११.०० कोटी = २६३.०९ कोटी)

**सन २०१७-१८**

**सन २०१७-१८ मधील महत्वाच्या पूर्णत्वास /सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/ प्रकल्पांची नावे**

- **स्वारगेट येथे उडड्राणपूल बांधणे –** स्वारगेट चौकात उडड्राणपूल बांधणेचे काम पुणे महानगरपालिकेमार्फत अंशदान ठेव पध्दतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करून घेणेत आले आहे. हडपसर रस्त्यावर आयकर भवन येथे सुरू होऊन सारसबाग रस्त्यावरील धम्म विपश्यना केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंतचा वाहन भुयारी मार्ग दि.१९/०५/२०१७ रोजी वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.
- **अभियांत्रिकी महाविद्यालय ते पाटील इस्टेट दरम्यान उडड्राणपूल बांधणे –** सदर पुलाचे (पुणे आर.टी.ओ. ते पाटील इस्टेट) काम पूर्ण झाले असून, सदर पूल वाहतुकीसाठी खुला करणेत आला आहे. या पुलाचे कामामुळे अभियांत्रिकी महाविद्यालय चौकातील वाहतूक कोंडी कमी होणेस मदत झाली आहे.
- **मुंढवा येथे मुळा मुठा नदीवर पूल बांधणे –** नगर रस्ता ते हडपसर यांना जोडणाऱ्या रस्त्यावर मुळा मुठा नदीवर नवीन पुल बांधण्याचे काम हाती घेणेत आलेले आहे. सदर कामाची प्रकल्पीय र.रू. २३.४६ कोटी इतकी आहे.
- **युनिव्हर्सल चौक व कमिन्स कॉलेज चौक वारजे रोड येथे उडड्राणपूल बांधणे –** माहे एप्रिल २०१७ अखेर कमिन्स कॉलेज चौकातील उडड्राणपुलाचे सुमारे ९२% काम पूर्ण झाले असून माहे जानेवारी २०१८ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
- **लुल्लानगर चौकात उडड्राणपूल बांधणे –** पुणे कॅन्टोनमेंटकडून कोंढव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील लुल्लानगर चौकात उडड्राणपूल बांधण्याचे काम पुणे महानगरपालिकेतर्फे सुरू आहे. प्रस्तुत उडड्राणपुल ३९८ मी. लांबीचा असून त्यामध्ये इलेव्हेटेड भागाची लांबी १०५ मीटर व दोन्ही बाजूचे मिळून ॲप्रोच रस्त्याची लांबी एकूण ३१० मीटर इतकी आहे. या प्रकल्पाचे ४०% काम जागेवर पूर्ण झाले असून, माहे मार्च २०१८ पर्यंत सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- **मुंढवा स.नं. ८९ व ७१ दरम्यानचे पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर २४ मी.एच.सी.एम.टी.आर. साठी रेल्वे ओलांडणी पूल बांधणे –** या प्रकल्पाचे एकूण ७५% काम पूर्ण झाले असून दि.२०/०५/२०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पामुळे एच.सी.एम.टी.आर. रस्ता जोडला जाणार असून, मगरपट्टा व हडपसर परिसरातील वाहतूक या रस्त्यावरुन सुरु होऊन सध्याच्या मगरपट्टा रस्त्यावरील व सोलापूर रस्त्यावरील वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच या पुलामुळे कोरेगांव पार्क, येरवडा विमानतळ भागात ये-जा करणाऱ्या वाहनांचे एकुण २ कि.मी.ने अंतर कमी होणार आहे.
- **अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे –** यामध्ये जागामालकाबरोबर तडजोडीने वाद मिटविणेत आलेला आहे. पुलाचे काम एप्रिल २०१७ अखेर सुरु करणेत आलेले असून ३१ मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.
- **डेंगळे पुलास नवीन समांतर पूल तयार करणे –** अस्तित्वातील जुना डेंगळे पूल वाहतुकीसाठी कमी पडत असल्याने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध झाल्याने माहे डिसेंबर २०१६ मध्ये र.रु.२०.२३ कोटीची निविदा मान्य करुन वर्कऑर्डर देण्यात आली आहे. आजमितीस सदर काम ४०% पूर्ण झाले असून, जुलै २०१८ पर्यंत काम पूर्ण होईल.

- **शहरी एकात्मिक सायकल योजना –** पुणे महानगरपालिकेमार्फत शहरी वाहतूक नियोजन यांचे सहाय्याने Non Motorised Transport (NMT) अंतर्गत पुणे शहरासाठी एकात्मिक सायकल आराखडा (Comprehensive Bicycle Plan for Pune City) तयार करण्यात आला होता. सदर ड्राफ्ट मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंट यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यास मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंट, भारत सरकार यांची दि.२०/१२/२०१४ मान्यता मिळालेली आहे.

- सार्वजनिक सायकल योजनेचा आराखडा सदर सल्लागार यांनी पुणे महानगरपालिकेस सादर केला आहे. त्या अनुषंगाने सदरचा आराखडा पब्लिक बायसिकल शेअरींग सिस्टीमचे धोरण व त्याअनुषंगाने संस्था/ चालक यांचेशी करावयाचा करारनामा मा.मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांचेकडे मान्यतेस सादर करणेत आला व तो मा.मुख्य सभा ठराव क्र.६९३, दि.१४/१२/२०१७ अन्वये मान्य करणेत आला. सदर मान्यतेस अनुसरुन दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी –

- Mobike B.V., Jan Pietersz, Coenstraat 2595WP's – Gravenhage, Netherlands
- OFO (HK) Ltd. Suit 603, 6th Floor, Law Conmmericial PLAZA, 788 Cheunsha Wan road, Kowloon, Hong Kong.
- YULU BIKE PRIVATE LIMITED, 119, Adarsh Plam Retreat, Outer Ring Road, BEngaluru- 560103.

  तसेच दि.२१ डिसेंबर २०१७ रोजी –

- Zoomacar India Private Limited, Karnataka

  यांचे समवेत समजुतीचा करारनामा करणेत आला आहे.

- सदर कंपन्यामार्फत पुणे शहरातील विविध ठिकाणी सायकल पुरविणेत येणार असून, पब्लिक बायसिकल शेअरिंग योजनेमुळे पुणे महानगरपालिकेस कोणतीही आर्थिक तोशिष लागणार नाही.

## सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

### सन २०१८–१९ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना

- सन २०१८–१९ च्या अंदाजपत्रकात नव्याने औंध – सांगवी जोडणाऱ्या मुळा नदीवर पुल बांधणे, सनसिटी सिंहगड रोड ते कर्वेनगर नदीवर पुल उभारणे, हडपसर मध्ये काळेपडळ व रामटेकडी येथील गेट क्र. ६ व ७ तसेच गेट क्र. ७ व ८ या दरम्यान हलक्या वाहनांकरीता भुयारी मार्ग बांधणे, हॅरीस पुलालगत नवीन पुल बांधणे, प्रभाग क्र. १२ ब कर्वे पुतळा चौकात वाहतुकीच्या दृष्टीने कायम स्वरुपी उपाययोजना करणे या कामांतर्गत कर्वे पुतळा चौकात उड्डाणपुल/वाहन भुयारी मार्ग बांधणे, गोल्फ क्लब चौक येरवडा येथे ग्रेडसेपरेटर/सब वे बांधणे, कर्वे रस्ता व नळस्टॉप चौकात उड्डाणपुल बांधणे, चांदणी चौक विकसित करणे, पुणे शहरातील घोरपडी येथे मिरज रेल्वे लाईन व पुणे सोलापूर रेल्वे लाईन क्रॉसिंगवर उड्डाणपुल बांधणे, सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक उड्डाणपुल बांधणे, येरवडा येथे नवीन पुल बांधणे, पुणे शहराची वाढती लोकसंख्या व वाहतुकीवर येणारा ताण या बाबींचा विचार करता सक्षम व सुलभ वाहतुकीकरीता यावर्षी पुणे मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहे.

- **हॅरीस पुलालगत नवीन पुल बांधणे –** पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपाकडून संयुक्तपणे आर्थिक तरतूद वापरुन करणेत येत आहे.

- **प्रभाग क्र. १२ क कर्वे पुतळा चौकात वाहतुकीच्या दृष्टीने कायमस्वरुपी उपाययोजना करणे या कामांतर्गत कर्वे पुतळा चौकात उड्डाणपुल/ वाहन भुयारी मार्ग बांधणे –** कर्वे पुतळा चौक येथे कर्वे रस्त्यावरील वाहतूक कोथरुड गावठाण, एन. डी. ए. रस्त्यावरील वाहतूक एकत्र होत असल्याने, सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यावर वरील समस्या दूर होणार आहे.

- **गोल्फ क्लब चौक येरवडा येथे ग्रेडसेपरेटर/सब वे बांधणे –** सदर भागासाठी विषयांकित प्रकल्प महत्वाचा असून त्याची अंमलबजाणी झालेवर वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

- **कर्वे रस्ता व नळ स्टॉप चौकात फ्लायओव्हर बांधणे –** सदर कामाचे संकल्प चित्रास मा. तांत्रिक छाननी समिती, पुणे मनपा यांचा ठराव क्रं. ९७, दि.२०/११/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. या कामासाठीचे संभाव्य खर्चाचा तपशिल नुकतेच महा मेट्रोकडून पुणे यांनी मनपास कळविण्यात आला असून, त्याची पडताळणी करण्याचे काम चालु आहे.
- **चांदणी चौक विकसित करणे –** सदरचा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एन.एच.०४) यांचेमार्फत करणेत येणार आहे. राष्ट्रीय राजमार्ग क्र.४ च्या बाजुचे सर्व्हिस रस्त्यांचे भूसंपादन करणे कामी सदरची तरतुद वापरणेत येणार आहे.
- **पुणे शहरातील घोरपडी येथे मिरज रेल्वे लाईन व पुणे सोलापुर रेल्वे लाईन क्रॉसिंगवर उड्डाणपुल बांधणे –** घोरपडी गावांचा काही भाग हा पुणे कॅन्टोन्मेट हद्दीत येतो. तसेच सुमारे ७०० मी. अंतरावर पुणे मिरज रेल्वे लाईन व सोलापूर रेल्वे लाईन असे दोन रेल्वे क्रॉसिंग अस्तित्वात आहेत. या समस्येवर उपाययोजना करणेसाठी पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे सोलापुर रेल्वे लाईन व पुणे मिरज रेल्वे लाईन येथे दोन संलग्न रेल्वे उड्डाणपुल प्रस्तावित करण्यात आले आहेत. प्रस्तावित पुलांसाठी आवश्यक जागा भारतीय रेल्वे, पुणे कॅन्टोन्मेंट व संरक्षण विभाग आणि खाजगी मिळकती यांचे अखत्यारीत असून, त्यातील रक्षा संपदा विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेमार्फत प्रस्तावित उड्डाणपुलास दि.०२/०८/२०१६ अन्वये Working Permission देण्यात आलेली असून सदर परवानगी पत्रातील अटी व शर्तीप्रमाणे काम करणे मा. मुख्य सभा ठराव क्रं. ४६४, दि.१०/११/२०१७ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर योजनेकरीता मे. सी.व्ही.कांड यांची तज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचेमार्फत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून, पुलासाठी आवश्यक असलेल्या जागेचे संपादन करणेबाबत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.
- **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प –** या प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा अदा करण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये पुणे महानगरपालिकेमार्फत र.रु.१२.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे. तथापी, पुणे मेट्रो रेल प्रकल्पाची अंमलबजावणी ५ वर्षात होणार असल्याने प्रत्येक आर्थिक वर्षात होणाऱ्या खर्चाचा ५ वर्षासाठी विभागणी तक्ता महाराष्ट्र मेट्रो रेल कोर्पोरेशन लि. यांनी पुणे मनपाकडे सादर केल्यानंतर सदर खर्चास पुणे महानगरपालिकेच्या मा. मुख्य सभेची मान्यता घेऊन सदर निधी महाराष्ट्र मेट्रो रेल कोर्पोरेशन लि. यांना अदा करणेत येईल.
- **औंध-सांगवी जोडणाऱ्या मुळा नदीवर पुल बांधणे –** सदरचा प्रकल्प पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचा संयुक्त प्रकल्प आहे. सदर परिसरामध्ये वाहतुकीचा प्रश्न सोडविण्याकरीता विषयांकित प्रकल्प महत्वाचा आहे.
- पुणे शहरासाठी दीर्घकालीन Integrated Multimodal Transport Plan तयार करण्यात येणार असून त्याकरीता र.रु.२.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

## (७) पथ (भांडवली तरतूद र. रु.५०३.०० कोटी + महसूली तरतूद र.रु. १९६.७६ कोटी = ६९९.७६ कोटी)

**सन २०१७-१८**

- **स्टॉर्म वॉटर ड्रेनेज –**

पुणे महानगरपालिकेमार्फत वारंवार पुरसदृष्य परिस्थिती निर्माण होणाऱ्या ठिकाणी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज वर्क्स फॉर फ्रिक्वेन्टली फ्लडिंग एरियाज इन पुणे सिटी (Strom Water Drainage Project for Frequently Flooding Areas in Pune City) र.रु.४८२.०० कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल मे. प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि. यांचे मार्फत तयार करण्यात आला, त्यापैकी पहिल्या टप्प्यात पुणे महानगरपालिकेमार्फत तरतूद उपलब्ध करुन स्टॉर्म वॉटर ड्रेनेज मास्टर प्लॅनच्या आधारे र.रु.

११५.८४ कोटी रकमेची कामे सुरू केलेली आहेत. त्यामध्ये भाग १ व भाग २ करिता अनुक्रमे सुमारे ९७% व ७५% काम पूर्ण झाले आहे.

- **अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन –**

  राष्ट्रीय नागरी परिवहन धोरण व सर्वंकष वाहतूक आराखड्यानुसार पुणे शहरातील रस्त्यासाठी योग्य ते नियोजन करणेसाठी व सर्व रस्त्यांचे रुंदीनुसार रस्त्यांचे डिझाईनमध्ये एकसुत्रता राहणेसाठी सर्व अभियंता यांना मार्गदर्शन ठरेल यासाठी अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार रस्त्यांचे पुर्नविकसन करताना या पुस्तिकेतील मार्गदर्शक नकाशांचा वापर करण्यात येत आहे.

- **कात्रज कोंढवा रस्ता –**

  कात्रज कोंढवा रस्ता हा पुणे–सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४, पुणे–सासवड मार्गे व पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.९ या रस्त्याला जोडणारा बाहयवळण रस्ता आहे. पुणे मनपा हद्दीतील ३.७ कि.मी. रस्त्याच्या विकसनाबाबत प्रस्ताव तयार केलेला आहे. सदर रस्त्याला जोडणाऱ्या अन्य रस्त्यांमुळे रहदारीत अडथळे होणार नाही, यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रस्तावामध्ये पूर्ण ८४ मी. रुंदीचे विकसन करताना एकुण ५ ठिकाणी अंडरपास व ग्रेड सेप्रेटर यांचा समावेश केलेला आहे. त्यासाठी सुमारे र.रु.२१५.०० कोटीचा खर्च अपेक्षित असून त्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे.

**बी.आर.टी. योजना –**

- पुणे महानगरपालिका मा. मुख्य सभेने सर्वकष वाहतुक आराखडयास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वाढविणेचे उद्दीष्ट आहे. पुणे मेट्रोचे काम चालु झाले आहे. पुणे मेट्रोशी संलग्न व सुसंगत अशी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणजे बसची वाहतूक व्यवस्थाही सुधारणे आवश्यक आहे. तसेच बी.आर.टी.चे मार्गही वाढविणे आवश्यक आहे. यापुर्वी पुणे महानगरपालिकेने संगमवाडी ते विश्रांतवाडी चौक हा ७ कि.मी., आळंदी रस्ता आणि येरवडा पर्णकुटी चौक ते खराडी हा ९ कि.मी. नगर रस्ता बी.आर.टी. मार्ग विकसित केलेला आहे.
- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रावेत ते सांगवी फाटा व निगडी ते दापोडी पर्यंत बी.आर.टी. मार्ग सुरु केलेला आहे. या मार्गाशी संलग्न पुणे महानगरपालिकेच्या हददीमध्ये औंध, राजीव गांधी पुल ते सिमला ऑफिस हा सुमारे ६.५ किमी व हॅरिस पुल ते पाटील इस्टेट जंक्शन पर्यंत सुमारे ५.७ किमीच्या बी.आर.टी.मार्गाचे नव्याने विकसन करण्याचे काम सुरू झाले आहे. तसेच संगमवाडी ते पाटील इस्टेट जंक्शन पर्यंत सुमारे १.२ किमी बी.आर.टी.मार्ग वाढविणेचे कामही सुरु करण्यात येणार आहे.
- सातारा रस्ता, स्वारगेट ते कात्रज दरम्यानचा जुन्या दहा वर्षापुर्वीच्या बी.आर.टी. मार्गामध्ये दोन उड्डाण पुल, दोन अंडरग्राऊंड रस्ते इत्यादी विविध कामे करताना बी.आर.टी.मार्गाची मोडतोड झाल्याने स्वारगेट ते कात्रज या सुमारे ६.२ की.मी. बी.आर.टी. मार्गाची पुर्नबाधणी व पुर्नविकसनाचे काम सुरु करण्यात आले आहे. यामध्ये नव्याने बी.आर.टी. मार्गाचे मध्यभागी बस शेल्टर, पदपथ, सायकल ट्रॅक, स्वतंत्र मोटार व्हेईकल लेन, सार्वजनिक टॉयलेट ब्लॉक, किऑस्क, नागरीकांना सार्वजनिक वापरासाठी जागा ई.सुविधांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तसेच याच धर्तीवर पुणे–सोलापूर रस्ता बी.आर.टी. मार्गाची पुर्नबांधणी करण्यात येणार आहे.

**सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक** (भांडवली व महसुली तरतूद रक्कम रुपये **५८९.५५** कोटी)

- **एच.सी.एम.टी.आर.प्रकल्प –**

  पुणे मनपाच्या १९८७ च्या मान्य विकास आराखडयामध्ये २४ मी. रुंदीचा एच.सी.एम.टी.आर.रस्ता दर्शविणेत आला असून, त्याची लांबी सुमारे ३५ कि.मी. इतकी आहे. या कामासाठी मे.स्तूप कन्सल्टंट या तज्ञ सल्लागाराची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी नेमणूक करणेत आली आहे. त्यानुसार तज्ञ सल्लागार यांनी विस्तृत प्रकल्प अहवाल सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये २४ मी. रुंदीमध्ये

मध्यभागी सार्वजनिक व्यवस्थेच्या अनुषंगे बी.आर.टी. दोन मार्गीका व दोन्ही बाजुस इतर वाहनांसाठी दोन मार्गीका सुचविणेत आल्या आहेत. एकुण सहा पदरी रस्ता प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचा तांत्रिक आराखडा मा.मुख्य सभेने मजुंर केला असून, प्रल्कपासाठी आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करणेसाठी मार्गदर्शक सल्लागार नेमण्याची कार्यवाही सुरू आहे.

- **पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम –**

  सदर प्रकल्पा अंतर्गत पुणे मनपा हद्दीतील १०० कि.मी. लांबीपैकी सुमारे ३० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले असून पहिल्या टप्प्यात जंगली महाराज रस्त्याचे (लांबी सुमारे २ कि.मी.) काम पुर्ण करण्यात येत आहे. त्याबरोबर डेंगळे पुल ते बालगंधर्व पुल व फॅर्ग्युसन कॉलेज, महर्षी कर्वे रस्त्याचे सुशोभिकरणाचे काम सुरू करण्यात येत आहे. तसेच पुणे शहरातील दाट लोकवस्ती भागामधील प्रमुख वर्दळीचे रस्ते उदा. लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, शास्त्री रस्ता व शिवाजी रस्ता यांची पुर्नविकसन व पदपथ विकसनाची कामेही सुरू करण्यात येत आहेत.

- **बी.आर.टी. –**

  पुणे शहरामध्ये सध्या काम सुरू असलेल्या व भविष्यातील मेट्रो मार्गांशी संलग्न असलेल्या पुणे–मुंबई रस्ता, गणेशखिंड रस्ता, पुणे–सातारा रस्ता व पुणे–सोलापूर रस्ता या बी.आर.टी. मार्गिकांचे काम पुणे महानगरपालिकेच्या अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईड लाईन्सच्या अनुषंगाने सुसंगत (उदा. पदपथ, सायकल मार्ग, इ.) करण्यात येत आहे.

- **पादचारी धोरण अंमलबजावणी –**

  पुणे महानगरपालिकेच्या पेडेस्ट्रियन पॉलिसी मधील तरतूदीनुसार पादचाऱ्यांसाठी पुणे शहरातील मुख्य रस्त्यांवरील पदपथ हे सुरक्षित व सुलभ अशा रितीने विकसित करणे व त्यांची सुधारणा कामे करण्यात येत आहेत. उदा. बिबवेवाडी–कोंढवा रस्ता, स्वामी विवेकानंद रस्ता, म्हाळगी पथ, गोळवलकर गुरूजी रस्ता, वेलेस्ली रस्ता, पेशवे पथ, ससाणेनगर रस्ता, महंमदवाडी रस्ता, बाणेर रस्ता, इ.

## (८) <u>पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.(र. रू.२७३.०४ कोटी)</u>

### सन २०१७–१८

- पुणे महानगर परिवहन महामंडळाने १००० नवीन स्वमालकीच्या बसेस घेण्याबाबत कार्यवाही सुरू केली आहे.
- पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच २०० मिडी बसेस दाखल होत आहेत. ८०० बी.आर.टी. बसेस घेण्याची कार्यवाही सुरू असून सद्यस्थितीला पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या एकूण १२९२ स्वमालकीच्या बसेस असून पुढील वर्षी त्यामध्ये १००० बसेसने वाढ होणार आहे.
- १२९२ बसेसपैकी साधारणपणे १०७५ बसेस मार्गावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे प्रवाशांना जास्तीतजास्त संख्येने स्वच्छ, सुरळीत, तत्पर व सुरक्षित बससेवा उपलब्ध होत आहे.

### सन २०१८-१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- सन २०१८-१९ च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात र. रु.२७३.०४ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रू. (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १. | इ.५वी ते १० वी पर्यंतचे विद्यार्थांना मोफत पासेस/बससेवा | ७.२० |
| २. | नागरवस्ती विकास योजना अंध/अपंग पासेस | ५.०० |
| ३. | विविध सवलतीचे पासेस | ३०.५० |
| ४. | मा.नगरविकास विभाग शा.नि.क्र.एनयुआर-२०१३/प्र.क्र.३३८/नवि-३३, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि.१८/०२/२०१४ नुसार संचलन तुट | १२२.३४ |
| ५. | ८०० बसेस खरेदी प्रक्रियेसाठी | १००.०० |
| ६. | डेपो डेव्हलपमेंटसाठी | ८.०० |
| | **एकूण** | **२७३.०४** |

## (९) नदीसुधारणा प्रकल्प (र.रु.९२.१५ कोटी)

### सन २०१७-१८

- **नदीसुधारणा प्रकल्प राबविणे-** पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड या भागांच्या हद्दीतून वाहणा-या अंदाजे ४४ कि.मी. लांबीच्या मुळा,मुठा, मुठा व मुळा-मुठा नदीकाठ सुशोभिकरण व विकसनाबाबत नदयांचे जलशास्त्रीय सर्वेक्षण करणे, डिझाईन नकाशे तयार करणे, डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, तसेच संबंधित सर्व शासकीय व निमशासकीय विभागाकडील मान्यता घेणे इ. स्वरुपाची कामे करण्यासाठी तज्ञ सल्लागार मे. एच.सी.पी.डिझाईन प्लॅनिंग ॲन्ड मॅनेजमेंट प्रा.लि., अहमदाबाद यांना कार्यादेश निर्गमित करणेत आला असून, या कामामध्ये रामनदीचाही समावेश करणेत आला आहे. सदरचे काम मे २०१८ अखेरपर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

### सन २०१८-१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड या भागांच्या हद्दीतून वाहणाऱ्या अंदाजे ४४ कि.मी. लांबीच्या मुळा, मुठा व मुळा-मुठा नदीकाठ सुशोभिकरण व विकसनाबाबत नदयांचे जलशास्त्रीय सर्वेक्षण करणे, डिझाईन नकाशे तयार करणे, डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, तसेच संबंधित सर्व शासकीय व निमशासकीय विभागाकडील मान्यता घेणे इ. स्वरुपाची कामे करण्यासाठी तज्ञ सल्लागार (मे.एच.सी.पी. डिझाईन, प्लॅनिग ॲन्ड मॅनेजमेंट प्रा.लि., अहमदाबाद) यांना कार्यादेश निर्गमित केला असून, नदीशी संलग्न शासनाच्या एकूण सात संस्था आहेत. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे कामे करण्यात येणार आहेत.

  १. केंद्रीय प्रदुषण मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

  २. नदीकाठ विकसन प्रकल्पास नागरिकांचा प्रतिसाद.

  ३. अंतिम प्रकल्प अहवाल तयार करणे.

  ४. नदीशी संलग्न असलेल्या विविध विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे.

  ५. वरील संस्था मिळुन एस.पी.व्ही. कंपनी स्थापन करणे.

६. नदीकाठ प्रकल्प अहवालास मा. मुख्य सभेची मान्यता घेणे.

७. सदर प्रकल्प अहवाल राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणे.

८. नदीची पूर वहन क्षमता वाढविणेस मदत होणार आहे.

- नदीच्या कॅचमेंट एरिया मध्ये पडणारा पाऊस व धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन , नदीच्या हायड्रोलीक्स व हायड्रोलॉजी शास्त्रीय अभ्यासानुसार (Computer Modelling) नदीचे क्रॉससेक्शन ठरविण्यात येणार आहे. नदीकाठी असलेला रहिवाशी भाग सुरक्षित होणेस मदत होणार आहे.
- नागरिकांना नदीकाठी आकर्षित करण्यासाठी दोन्ही तीरांवर पब्लिक स्पेसेस तयार करण्यात येणार आहे. यामध्ये हरित विकास, जॉगींग ट्रॅक, उद्यान, बेंचेस अशा सुविधा निर्माण करण्यात येतील. तसेच गणपती विसर्जन घाट, अस्तित्वातील घाटांची दुरुस्ती व सुशोभिकरण करण्यात येईल.
- नदीमध्ये स्वच्छ पाणी राहवे यासाठी केवळ प्रक्रिया केलेले पाणी नदीत सोडण्यात येईल. यासाठी जायका प्रकल्पाचा मोठा हातभार लागणार आहे. स्वच्छ पाण्यामुळे नदीचे दृष्य स्वरुप बदलून जाणार आहे व नदीकाठच्या पाणथळ परिसंस्था (RIPARIAN ECOSYSTEM) निर्माण होऊन पाण्यातील जैवविविधता संपन्न होणेस मदत होणार आहे.
- नदीकाठ विकसन प्रकल्प केल्याने शहरातील नागरिकांना उद्यान, वॉकिंग प्लाझा, सायकल ट्रॅक इ. सोयी सुविधांचा लाभ होणार आहे. तसेच रहदारीविना नागरिकांना नदीकाठचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाता येणार आहे.
- सद्या नदीकाठी अस्तित्वात असलेली उद्याने नदीकाठ विकसन प्रकल्प अंतर्गत घेतल्याने उद्यानांचा विकास होण्यास मदत होणार आहे. तसेच दुर्लक्षित असलेली वारस विकसित केल्याने नागरिकांचा वावर वाढणार आहे.

## (१०) उद्यान (भांडवली तरतूद र. रु.५६.०० कोटी + महसूली तरतूद र.रु. ४७.६४ कोटी = १०३.६४ कोटी)

**सन २०१७–१८**

- **छत्रपती संभाजी महाराज उद्यानात अस्तित्वातील मत्सालयाचे विस्तारीकरण**

  छत्रपती संभाजी महाराज उद्यानात सन १९५२ पासुन मत्सालय कार्यान्वीत असुन सदर मत्सालयाचे आधिनिक पध्दतीने विस्तारीकरण करयात आले आहे.सदर विस्तारीकरनामध्ये नव्याने ११ टाक्या बनविणेत आल्या आहेत. व या सर्व विस्तारीकरणाचे ५ वर्षाकरीता देखभाल दुरुस्तीसह विस्तारीकरण कार्यान्वीत करण्यात आले आहे. सदर विस्तारीकरणाकरीता सुमारे र.रु.२५० लक्ष इतका खर्च झाला आहे.

- **रिव्हर्स ऑसमॉसिस वॉटर ट्रिटमेंट प्लांट**

  पुणे महानगरपालिकेच्या विविध उद्यानात नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी १७ उद्यानात रिव्हर्स ऑसमॉसिस वॉटर ट्रिटमेंट प्लांट सह हिरकणी कक्ष बांधण्यात आले आहे. तसेच रिव्हर्स ऑसमॉसिस वॉटर ट्रिटमेंट प्लांट हा सोलर पॅनलवर कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत.

- **स्व.राजीव गांधी प्राणी संग्रहालय**

  स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय, कात्रज येथे नीलगायांसाठी नव्याने खंदकाची उभारणी करणे नाईट हाऊस व पॅगोडा उभारणे तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा, वृक्षारोपन करुन नव्याने अद्यायावत स्वरुपाचे खंदक उभारणी केल्याने नागरिकांना पाहण्यासाठी आकर्षक असे खंदक उपलब्ध झाले आहे.

**सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- **पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड रोड फेज ३**

  पु.ल.देशपांदे उद्यान, सिंहगड रोड फेज–३ येथे दिल्ली हटच्या धर्तीवर कलाग्राम विकसीत करणेत येणार आहे.

  स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय कात्रज येथे हत्तीसाठी पोहण्याचा तलाव बांधणेत येत असून लहान मुले व नागरिकांना तलाव पाहणे हे उद्यानाचे प्रमुख आकर्षण होणार आहे.
- **गुलटेकडी फा. प्लॉट नं ४३८ पुनावाला गार्डन शेजारील नियोजीत उद्यान**

  पुणे शहरात प्रथमच टोपेरी प्रकारात प्राण्यांच्या कलाकृती चे उद्यान साकारण्यात येत आहे.
- **स.नं .४८ काळेपडळ, हडपसर येथील नियोजीत उद्यान** सदरचे उद्यानात पुणे शहरात प्रथमच सुर्यपरिमंडळावर आधारित उद्यान विकसीत करण्यात येत आहे.
- **सुगम्य भारत योजने अंतर्गत शहरातील विविध उद्यानामध्ये दिव्यांग व्यक्तिकरिता स्वच्छतागृह बांधणे व इतर सोयीसुविधा निर्माण करणेचे नियोजन आहे.**

## (११) विद्युत (भांडवली तरतूद र. रु.१०.३९ कोटी + महसूली तरतूद र.रु. १०१.९३ कोटी = ११२.३२ कोटी)

**सन २०१७–१८**

- ऊर्जा बचत करणेसाठी व पथदिव्यांसाठी दैनंदिन देखभाल दुरुस्तीवर होणाऱ्या खर्चामध्ये बचत होण्याच्या दृष्टीने शहरामध्ये एस्को तत्वावर एलईडी दिवे बसविण्याचे काम करण्यात येत आहे. माहे डिसेंबर २०१७ अखेर शहरातील विविध रस्त्यांवर ७४,००० एल.ई.डी. दिवे बसविण्यात आलेले आहेत. त्यानुसार माहे नोव्हेंबर २०१७ अखेर १.२ कोटी युनिट एनर्जी सेव्हिंग झालेले आहे.
- प्रकल्पाव्दारे बचत होणारी वीज प्रतिवर्षी २००० टन कोळशापासून निर्माण होणाऱ्या विजेइतकी असेल. एलईडी दिव्यांचे आयुष्यमान (१०–२०%) जून्या पध्दतीच्या दिव्यांच्या प्रकाशाची आयुष्यमानापेक्षा जास्त असते. तसेच १२ वर्षांसाठी नवीन दिवे बसविणे/देशभाल मोफत होऊ शकते. ह्या दिव्यांच्या प्रकाशाची तीव्रता जुन्या दिव्याइतकीच किंवा आवश्यक अशा IS 1944 या मानकापेक्षा जास्त असते. तसेच अधिक चांगल्या दर्जाचा शुभ्र प्रकाश देण्याबरोबरच सुरक्षित पर्यावरणाला मदत होते.
- हा प्रकल्प सार्वजिक खाजगी भागीदारी (PPP) पध्दतीने कोणत्याही Capex गुंतवणुकीशिवाय किंवा पुणे शहरावर कोणताही जास्तीचा आर्थिक भार न टाकता कार्यान्वित केला जाईल. नियंत्रण आणि व्यवस्थापन केंद्र पुढील कामे करेल :– प्रकाशाच्या तीव्रतेचे केंद्रीभूत व्यवस्थापन आणि नियंत्रण, पथ दिव्यांचे रिमोट पध्दतीने प्रभावी संचलन, दोषांची माहिती देणे आणि कार्यवाहीवर देखरेख, या प्रकल्पाद्वारे नागरिकांसाठी असलेल्या मोबाईल ॲप आणि मोफत दूरध्वनी क्रमांकाच्या माध्यमातून तक्रारींची दखल घेऊन त्यांचे निराकरण प्रभावीरीत्या केले जाईल.
- शहरामधील विविध रस्त्यांवरील पथदिवे नियंत्रण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानानुसार मध्यवर्ती नियंत्रण कक्ष सिंहगड रस्ता विद्युत भवन या ठिकाणी उभारण्यात आला आहे. सदर नियंत्रण कक्षामध्ये बंद दिव्यांबाबतची माहिती स्काडा तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध होणार आहे. सदर काम प्रगतीपथावर आहे.
- पंडित नेहरु स्टेडियम येथे दिवस–रात्र क्रिकेट मॅचेसकरिता तेथील मैदानावर करावयाच्या प्रकाश व्यवस्थेचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- पुणे शहरामधील एकूण २४ ठिकाणी पर्यावरणपूरक एअर पोल्यूशन यंत्रणा बसवून नव्याने कार्यान्वित आहेत. तसेच येरवडा, वैकुंठ, वानवडी, तुळशीराम घाट व खराडी या ठिकाणी यंत्रणा उभारण्यात येवून कार्यान्वित करण्यात आली आहे.

- लालमहल येथे ऐतिहासिक प्रकारची लाईटींग तसेच ध्वनिक्षेपण व प्रोजेक्टर यंत्रणा बसविणेचे काम प्रगतीपथावर आहे.

**सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- पुणे शहरातील विविध रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेकरिता यापूर्वी बसविण्यात आलेल्या एलईडी दिव्यांसाठी १००० फिडर पिलर्सला नवीन तंत्रज्ञान व स्काडा वापरुन सुधारणा करणेचे काम करण्यात येणार आहे.
- पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट ११ गावातील रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणे कामी र.रु.९.०० कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे.

## (१२) अमृत, JNNURM (वाढीव कालावधी)व स्मार्ट सिटी (र. रू.१३९.५० कोटी)

**सन २०१७–१८**

- अमृत व स्मार्ट सिटी अभियान या योजनेअंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०१७–१८ साठी आवश्यक तरतूद र.रु.२१७.४० कोटी मंजूर आहे.
- अमृत व स्मार्ट सिटी अभियानांमध्ये समावेश झालेल्या भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेसाठीची तरतूद र.रु.१२५.०० कोटी व वडगाव बुद्रुक प्रकल्पासाठी र.रु.१०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बीएसयूपी योजने अंतर्गत र.रु.२०.६५ कोटी तरतूद आहे.
- अमृत व स्मार्ट अभियान अंतर्गत नव्याने सुरु होणाऱ्या प्रकल्पांसाठी र.रु.५.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.
- अमृत व स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत नव्याने सुरु होणाऱ्या प्रकल्पांसाठी र.रु.५०.०० कोटी मनपा हिश्याची तरतूद करण्यात आली आहे.
- **सन २०१७–१८ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्प**
- अमृत व स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत प्रकल्पातील भामा आसखेड या प्रकल्पाचे काम पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यावर असून भामा आसखेड पाणी पुरवठा व वडगाव बुद्रुक या दोन प्रकल्पाचा चौथा हप्ता प्राप्त होण्याची शक्यता आहे.
- अमृत व स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत पुणे हरित क्षेत्र विकास प्रकल्प २०१५–१६ (प्रकल्पीय र.रु.१.०० कोटी) चा दुसरा हप्ता प्राप्त होण्याची शक्यता आहे.
- तसेच अमृत व स्मार्ट सिटी अभियानांतर्गत नव्याने सुरु झालेल्या पुणे हरित क्षेत्र विकास प्रकल्प २०१६–१७ प्रकल्पीय रक्कम रु.१.५० कोटी) व पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४ X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे (प्रकल्पीय र.रु.२६६.०० कोटी) चा प्रकल्प मंजूर झालेला आहे.
- पुणे हरित क्षेत्र विकास प्रकल्प २०१६–१७ या प्रकल्पासाठी केंद्रशासनाचे र.रु.१५ लाख व राज्यशासनाचे र.रु.७.४० लाख असे एकूण र.रु.२२.४० लाख पहिला हप्ता झालेला आहे.
- पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४ X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे या प्रकल्पासाठी केंद्रशासनाचे र.रु.२६.६० कोटी व राज्यशासनाचे र.रु.१३.३० कोटी असे एकूण र.रु.३९.९० कोटी पहिला हप्ता प्राप्त झालेला आहे.

**सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा या अर्थशिर्षकाखाली पुणे महानगरपालिकेच्या स्वःहिश्याची र.रु.५०.०० कोटी इतकी तरतूद सुचविण्यात आली आहे.

- अमृत व स्मार्ट सिटी अभियानांतर्गत पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४ x ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
- अमृत व स्मार्ट सिटी अभियानांतर्गत पुणे हरित क्षेत्र विकास प्रकल्प सन २०१८-१९ मध्ये मंजूर होण्याचे प्रस्तावित आहे.

## (१३) भवन रचना (भांडवली तरतूद र. रु.१६२.७९ कोटी + महसूली तरतूद र.रु. ४२.७८ कोटी = २०५.५७ कोटी)

**सन २०१७-१८**

- **सन २०१७-१८ मधील महत्वाच्या पुर्णत्वास/सुरु असलेल्या/नाविण्यपुर्ण योजना/प्रकल्प**
- मनपा भवन येथे विस्तारीत इमारतीचे काम प्रगती पथावर असून आर्थिक वर्षात पूर्ण करणे.
- उपआयुक्त कार्यालय क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या म.न.पा. मालकीच्या इमारतीसाठी अग्निशामक विभागाकरीता झोनल ऑफिसेस उभारणे/अग्निशामक यंत्रणेची कामे करणेत येणार आहेत.
- वारजे येथे छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट ॲकॅडमी उभारणेत येत आहे.
- सिंहगड रोड वडगाव बु. येथे श्री छत्रपती शिवाजी राजे भोसले सांस्कृतिक भवन व कला मंदिर बांधणे.
- सावरकर भवन येथे चौथ्या मजल्याचे काम पूर्ण करणे.
- शिवाजीनगर घोले रोड क्षेत्रिय कार्यालयाची इमारत पूर्ण करून वापरात येणार आहे.

**सन २०१८-१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- मनपा भवन येथे विस्तारीत इमारतीचे काम प्रगती पथावर असून या आर्थिक वर्षात बांधुन पूर्ण करणेत येणार आहे.
- कोथरुड येथील एक्झीबीशन ग्राउंड विकसित करणे.
- टिंगरेनगर व जनता वसाहत याठिकाणी लाईट हाऊस प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे.

## (१४) माहिती व तंत्रज्ञान (र. रू.४०.२५ कोटी)

**सन २०१७-१८**

- **Smart Governance**

  **PMC CARE** - पुणेकर नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून PMC CARE (Citizen, Assistance, Response, Engage) प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या अंतर्गत विविध सोळा माध्यमे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. या यंत्रणेद्वारे आतापर्यंत नोंदणीकृत नागरिकांची संख्या ४४,२७२ व ९० हजारपेक्षा अधिक तक्रारी प्राप्त होऊन ८८,३१८ (एकूण ९७% टक्के) तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. तसेच कॉलसेंटरच्या माध्यमातून एकूण १.२५ लाखापेक्षा जास्त नागरीकांमार्फत प्रतिसाद प्राप्त झाला आहे. पुणे महानगरपालिकेच्या नवीन संकेतस्थळाला आजतागायत जगभरातून २ कोटी ८४ लाख भेटी नोंदविण्यात आल्या. संकेतस्थळावर सर्व विभागाकडून नागरिकाभिमुख माहिती पारदर्शक पद्धतीने प्रसिद्ध केली जाते. या संकेतस्थळाला दररोज सरासरी १० हजार भेटीची नोंद होते. विविध विभागांचे डॅशबोर्ड विकसित करण्यात आले आहेत. संगणक प्रणालीमधील माहितीचा वापर करून Business Intelligence and Data Analytics प्रणाली विकसित करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेच्या विविध संगणक प्रणालींसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आवश्यक असलेले

Private Cloud द्वारे 24 Web Applications व एकूण 47 Virtual Machines कार्यान्वीत करण्यात आले आहेत. पुणे महानगरपालिकेने एम गव्हर्नन्स प्रकल्पाकरिता PMC Connect, Office Connect App, PMC STP APP, PMC CARE APP, PMC Building Permission, Pune Urban हे ॲप्सही विकसित करण्यात आल्या. सार्वजनिक गणेशोत्सवाचे यंदाचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष होते. यानिमित्त पुणे गणेशोत्सव, गणपती मिरवणुकांचे अपडेटस, छायाचित्रे, व्हिडिओ प्रसिद्ध करणेकरिता morya125.in संकेतस्थळ आणि मोबाईल ॲप विकसित करण्यात आले.

- **Cashless Strategy**

  Direct Benefit Transfer धोरणानुसार लाभार्थ्यांच्या आधार नंबरद्वारे बँक खात्यात जमा करण्यासाठी पुणे मनपाने स्वतंत्र डीबीटी प्रकल्प विकसीत केल्या. सदर DBT प्रणालीद्वारे नागरिकांना मनपा कर्मचारी व विद्यार्थींना एकूण ३० कोटींपेक्षा जास्त रक्कम DBT द्वारे अदा करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिकांना कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन मिळण्यासाठी पुणे महानगरपालिकेने Cashless Strategy तयार केली आहे. त्या अनुषंगाने नागरिकांना नागरी सुविधा केंद्र, मोबाईल ॲप्स, ई सुविधा, पॉस मशीन्सद्वारे डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन बँकिंग सुविधा द्वारे कॅशलेस माध्यमे उपलब्ध करून दिली आहे. तसेच BHIM App, UPI, BharatQR, NACH, BBPS इत्यादी माध्यमांद्वारे Cashless पध्दतीने व्यवहार करण्यासाठी कॅशलेस माध्यम उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर प्रकल्पांतर्गत ऑनलाईन माध्यमातून सन २०१७-२०१८ मध्ये एकुण व्यवहारापैकी ४८% पेक्षा जास्त ऑनलाईन व्यवहार करण्यात आले आहेत.

- **पुणे महानगरपालिकेचे विविध उपक्रम / प्रकल्पांना मिळालेले पुरस्कार**
- मे २०१७ मध्ये Digital Governance, Digital Literacy Initiatives, PMC CARE, STP Mobile App And Dashboard या प्रकल्पांना SKOCH 2017 चा Order of Merit, तसेच Property Tax Management करिता SKOCH Award चा Gold पुरस्कार मिळाला आहे
- Business World Magazine चा जून २०१७ मध्ये “Best Mobile App” पुरस्कार Pune Connect App ला प्राप्त झाला.
- सन २०१७ चे City Data करिता WCCD City Data Platinum Certificate पुणे महानगरपालिकेला प्राप्त झाला.

## सन २०१८-१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०१८-२०१९ या वर्षातील प्रस्तावित कामे खालीलप्रमाणे -
- **PMC CARE -** पुणे महानगरपालिकेने नागरिकांच्या सुविधेसाठी PMC CARE (Citizen Assistance Response Engagement) हा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. पुणे महानगरपालिकेच्या सर्व ऑनलाईन संगणक प्रणाली एकाच प्रणालीमधून नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच नागरिकांचा प्रशासनामध्ये सहभाग वाढविण्यासाठी ही प्रणाली PMC CARE 2.0 मध्ये अपग्रेड करण्याचे प्रस्तावित आहे.
- **मोबाईल गव्हर्नन्स -** पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांमधील अधिकाधिक सेवा सुविधा व माहिती नागरिकांना मोबाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी एम गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी सध्या असलेल्या PUNE CONNECT APP सह सर्व मोबाईल ॲप्सची देखभाल दुरुस्ती तसेच आवश्यक त्या नवीन ॲप्स तयार करणे प्रस्तावित आहे.
- **डॅशबोर्ड -** पुणे महानगरपालिकेच्या सर्व विभागांची माहिती डॅशबोर्डच्या माध्यमातून विकसित करुन त्याबाबत Centralised Platform कार्यान्वित करुन सर्व संगणक प्रणाली इंटिग्रेट करणे प्रस्तावित आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या Dashboards चे Platforms अद्ययावत करणे प्रस्तावित आहे.

- **वेबसाईट –** अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन विकसित करण्यात आलेल्या पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर सर्व विभागांची अद्ययावत माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या संकेतस्थळाच्या अद्यावतीकरण करण्याचे काम सुरू असून ते पुर्ण करून नव्याने तयार केलेले संकेतस्थळ लोकार्पित करण्याचे प्रस्तावित आहे.
- **डीबीटी –** पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभधारकांना मिळणारा लाभ थेट बँकेत जमा करण्यासाठी लाभाचे थेट हस्तांतरण (Direct Benefit Transfer) प्रणाली विकसित करुन संपूर्णपणे अंमलबजावणी प्रस्तावित आहे. या प्रणालीमुळे कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गतिमानता निर्माण होणार आहे.
- **क्लाऊड –** क्लाऊड तंत्रज्ञानाचा वापर करुन पुणे महानगरपालिकेच्या सर्व ऑनलाईन संगणक प्रणालीकरिता स्वतंत्र अत्याधुनिक डाटा सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहेत. भविष्यात विकसित होणाऱ्या सर्व संगणक प्रणाली अत्याधुनिक क्लाऊड डाटा सेंटरमध्ये होस्टिंग तसेच त्याबाबत सर्व प्रणालींचे क्लाऊडद्वारे मॉनिटरिंग प्रस्तावित आहे.
- **नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर –** पुणे महानगरपालिकेची मुख्य इमारत, सावरकर भवन, विविध क्षेत्रिय कार्यालये व संपर्क कार्यालयांमधील नेटवर्कचे अपग्रेडेशन करण्यात येणार आहे. याबाबत सर्व कार्यालयांमधील Network Infrastructure अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत करणे प्रस्तावित आहे. तसेच मनपाची सर्व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये Internet Bandwidth अपग्रेड करणे प्रस्तावित आहे.
- **डिजीटल एक्सपिरियन्स सेंटर –** पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांची माहिती, प्रकल्पांची माहिती नागरिकांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांच्या सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यासाठी किमान ४ डिजीटल एक्सपिरियन्स सेंटरची निर्मिती करणे प्रस्तावित आहे.
- **OPEN DATA –** पुणेकर नागरिक, शास्त्रज्ञ, विविध संस्था, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, इंजिनिअर्स यांना शहरातील विविध शासकीय विभागांची तपशीलवार माहिती Open Governance चे माध्यमातून उपलब्ध होणेकरिता आंतरराष्ट्रीय स्तरानुसार ओपन डेटा पोर्टल (opendata.punecorporation.org) विकसीत करण्यात आले आहे. सदर पोर्टलद्वारे मनपातील विविध विभागांची अधिकाधिक माहिती उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे.
- **Enterprise GIS -** पुणे महानगरपालिकेमार्फत Centralised Enterprise GIS Platform संगणक प्रणालीद्वारे विविध विभागांकडे उपलब्ध असलेले सर्व्हे व विविध संगणक प्रणालींचे इंटिग्रेशन करुन जीआयएस प्रणालींचा विविध प्रशासकीय कामकाजामध्ये प्रभावी वापर करणे प्रस्तावित आहे.
- **अधिकारी कर्मचाऱ्यांची क्षमताबांधणी –** पुणे महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करुन सर्व संगणक प्रणालींचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे प्रस्तावित आहे.
- **डिजीटल लिटरसी सेंटर्स –** नागरिकांना संगणक साक्षर करण्यासाठी झोपडपट्टी/दाट वस्तींच्या ठिकाणी २० डिजीटल लिटरसी सेंटर्स उभारण्यात येणार आहेत. त्यामध्ये २ लाईट हाऊस प्रकल्प कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.
- मुख्य लेखापाल विभागाकडील संगणकप्रणालीचे अद्ययावतीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.
- **Document Management -** सर्व विभागांकरिता Document Management System विकसीत करुन अंमलबजावणी करणे प्रस्तावित आहे.

## (१५) <u>हेरिटेज सेल (र. रू.२८.९० कोटी)</u>

**सन २०१७–१८**

**सन २०१७–२०१८ मधील महत्वाच्या पुर्णत्वास/सुरु असलेल्या/नाविण्यपुर्ण योजना/प्रकल्प**

- नाना वाडा या ऐतिहासिक वास्तु मधील उर्वरित टप्यामधील कामे पुर्ण करण्यात आली आहे. या मध्ये दरबार हॉलचे व  दर्शनी वाडयाचे जतन संवर्धनाचे काम पुर्ण झाले आहे.  नानावाडा या ऐतिहासिक वास्तुच्या तळमजल्यावरील दालना मध्ये आदय सशस्त्र क्रांतीकारकांच्या जीवन चरित्रावर आधारीत कायमस्वरुपी संग्रहालय उभारणेचे कामामध्ये फेज १ मध्ये ७ दालना मध्ये म्युझीयमचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- लालमहाल या ऐतिहासिक वास्तुचे प्लॅनिंगनुसार दगडी सुरक्षा/सीमा भिंत बांधणेत येत असून, संग्रहालय अंतर्गत विविध सुशोभीकरणाची कामे करण्यात येत आहेत.
- ब्रिटिश कालीन बंडगार्डन पुलावरील आर्ट प्लाझा या प्रकल्पास Adaptire reuse of a heritage bridge as a public place  बाबत २०१७ चा एशियन टाउनस्केप अॅवॉर्ड मिळाला आहे.
- विश्रामबागवाडा येथील जतन संवर्धनाची कामे करण्यात आली आहे. (पुण्य ते पुनवडी)

**सन २०१८–१९ दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- महात्मा फुले मंडई यांचे जतन संवर्धन व कामे करणे.
- विश्रामबागवाडा येथील तिसऱ्या टप्प्यातील जतन संवर्धनाची कामे करणे.
- नानावाडा येथील ऐतिहासीक वास्तुंच्या दालनामध्ये आद्य सशस्त्र क्रांतीकारकांच्या जीवनचरित्रावर आधारित कायमस्वरुपी संग्रहालय उभारण्याचे काम २ टप्यामध्ये पुर्ण करणे.
- हेरिटेज व टुरिझम डेव्हलपमेंट व्हीजन व मास्टर प्लॅन तयार करणे.

## (१६) शिक्षणासाठी आधुनिक सुविधा
## (प्राथमिक र. रू. ३६४.४६ कोटी, दुय्यम शिक्षण र. रू. ६०.०७ कोटी)

**सन २०१७–१८**

- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शासननिर्णयानुसार शिक्षकांना प्रशिक्षण देऊन वर्ग प्रगत करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. अप्रगत विद्यार्थ्यासाठी ‘सक्षम’ हा उपचारात्मक अध्यापनाचा वर्ग शाळा–शाळांमधून सुरु आहे.  त्यामध्ये अप्रगत विद्यार्थ्यांना जादाचा वेळ देऊन वर्ग प्रगत करण्यात येत आहे. १५ मॉडेलस्कूल व्दारे शिक्षकांना Best Practices दाखविण्यात येत आहेत.  १५ मॉडेलस्कूल मधील विद्यार्थी संख्या या शैक्षणिक वर्षात वाढली आहे.  या शाळांचे कामकाज उत्तमरित्या सुरु आहे. भाविष्यकाळात या शाळांची संख्या वाढविण्याचा मानस आहे.
- शिक्षकांनी केलेल्या शैक्षणिक उपक्रमाचा प्रसार होण्यासाठी शिक्षण उत्सव चे आयोजन करण्यात येते. यामधून शिक्षकांच्या उत्कृष्ठ  शैक्षणिक उपक्रमांचे प्रदर्शन व माहिती सर्व शिक्षकांना देण्यात येते.  विविध शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रगती झालेली दिसून येते.
- शिक्षक सहयोगी दल – शिक्षण विभागाकडे सहयोगी दलाची स्थापना करण्यात आलेली असून या दलामध्ये २९ विषयतज्ञ व २३ उच्च शिक्षित व अनुभवी शिक्षकांची निवड करून त्यांना प्रशिक्षित करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत शाळांमधील शिक्षकांना विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येते. सहयोगी दलाच्या सर्व ५२ शिक्षकांना अध्यापन व मार्गदर्शन यामध्ये सुलभता व आधुनिकता येण्यासाठी प्रत्येकास टॅबलेट पीसी देण्यात आले आहेत.  तसेच त्यांच्या अंतर्गत तीन प्रकल्प चालू आहे.  तसेच उर्दू माध्यमासाठी पढना लिखना सिखो हा १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रम चालू आहे व सर्व मुख्याध्यापकांसाठी प्रशिक्षण  व शाळा व्यवस्थापन समितीचे सक्षमीकरण चालू आहेत.
- **मॉडेल स्कूल -**  सन २०१७ – १८ पासून शिक्षण विभागाच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत असून १५ प्रशासकीय विभागातून प्रत्येकी १ याप्रमाणे १५ मराठी व २

उर्दू माध्यमाच्या मॉडेल स्कूल तयार करण्यात आल्या आहेत. या शाळांमधून विशेष भौतिक सुविधा, ज्ञानरचनावादावर आधारीत आनंददायी अध्यापन पध्दती, शालेय वेळेत वाढ करणे, विशिष्ट शैक्षणिक साहित्य, फर्निचर, वाचनालय, प्रयोग शाळा, संगणक कक्ष, स्वच्छतागृहे, सभागृह, प्रोजेक्टर इ. सुविधांसह विभागातील इतर शाळांमधील शिक्षकांना मार्गदर्शन करणे, मॉडेलस्कूलच्या माध्यमातून शैक्षणिक उपक्रमासाठी शाळांना आदर्श निर्माण करुन देणे यासाठी ही मॉडेल स्कूल योजना राबविण्यात येत आहे.

- **डायरेक्ट बेनिफिटट्रान्सफर** – शासनधोरणानुसार विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सुविधा व वस्तूंसाठी डीबीटी धोरण ठरविण्यात आले आहे. यामध्ये गणवेश, बुटमोजे, दप्तरे, वह्या, चित्रकला साहित्य, लेखन साहित्य, पाटया, बनियन, पेटीकोट, विद्यार्थी ट्रॅकसुट व बुट स्वेटर इ. वस्तुंचा अंतर्भूत केलेला आहे. त्यासाठी सन २०१७–१८ साठी र.रु.१६,०४,८४,०००/– इतकी तरतूद करण्यात आलेली होती.

- **झेन्सार फाऊंडेशन -** या संस्थेने चंदननगर येथील ५ शाळा दत्तक घेवून संगणक लॅब, शैक्षणिक उपक्रम, शिक्षक प्रशिक्षण, भौतिक इ. सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

- **थरमॅक्स फाऊंडेशन -** सन २०१६–१७ मध्ये इंग्रजी माध्यमांच्या ४ शाळा दत्तक घेवून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे. तसेच सन २०१७–१८ मध्ये सुध्दा त्याचप्रमाणे शिक्षण दिले जात आहे.

- **भारत फोर्ज लि. -** सन २०१६–१७ मध्ये मुंढवा येथील शाळेत आधुनिक स्वच्छतागृहे, पाण्याची टाकी अशा भौतिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत तसेच सन २०१७–१८ मध्ये हडपसर विभागातील गाडीतळ येथील शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत.

- **रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड -** सन २०१६–१७ व सन २०१७–१८ मध्ये नवनिर्मिती संस्थेच्या माध्यमातून गणित विषयासाठी १२०० शिक्षकांना कृतियुक्त प्रशिक्षण दिले आहे.

- **नॅस्कॉम फाउंडेशन —** सन २०१६–१७ मध्ये डिजिटल लिटरसी संदर्भात पालक व विद्यार्थी यांना संगणक प्रशिक्षण देण्यात येत होते. तसेच सन २०१७–१८ मध्ये त्याचप्रमाणे प्रशिक्षण चालू आहे.

## सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- **<u>ई लर्निंग योजना</u>**

- पुणे महानगरपालिका संचलित सर्व माध्यमाच्या एकूण १३७ शाळा इमारतीमधून कार्यरत आहेत. या शाळांमधून सर्वसामान्य घटकातील बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मोफत दिले जाते. शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी तंत्रज्ञानाभिमुख शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानभिमुख शिक्षणामध्ये खालील महत्वाच्या बाबींचा सामावेश होतो.

- **व्हर्चुअल क्लासरूम –** या अंतर्गत मनपा संचलित शाळांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि त्यांना शिकविणारे शिक्षक यांना सर्वोत्कृष्ट मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञ व्यक्तींकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन देण्याची सुविधा देणे.

- **ई–लर्निंग प्रणाली/डिजीटल क्लासरूम –** या अंतर्गत शाळांमध्ये सद्यस्थितीत सुरू असणाऱ्या दुरचित्रवाणी संचामधून इंटरनेट सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना विविध शैक्षणिक व्हिडीओ, उपक्रम इ.चा लाभ देणे.

- **ॲडाप्टीव्ह लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम –** पुणे शहरातील शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांना (विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, पालक, नागरिक इ.) नव्याने शिक्षण देणे, स्वयं अध्ययन करणे, निरंतर शिक्षण घेणे याकामी एक वेबपोर्टल निर्माण करणे आणि सदर पोर्टलवर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे. (अभ्यासक्रमाचे, माहितीचे व्हिडीओ निर्माण करून प्रसारित करणे इ.) सदर योजना पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग संचालित सर्व शाळांमधून कार्यान्वित करण्यात येत आहे.

- शिक्षण विभाग (प्राथमिक) चे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात विद्यार्थी केंद्रस्थानी मानून विविध योजनांसाठी आर्थिक तरतूद केली आहे. शासन धोरणानुसार प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या अंतर्गत शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर अधिक भर दिला आहे. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे, शालेय इमारतींचा वापर शैक्षणिक साहित्यासारखा करण्यासाठी बाला उपक्रम (Building As Learning Aid) शिक्षक प्रशिक्षण, सहयोगी शिक्षक दल, मॉडेल स्कूल, 'सक्षम' उपचारात्मक अध्यापन, बालवाडी वर्गाचे शैक्षणिक नियोजन, पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देणे. शाळांसाठी आवश्यक असणारे ई-लर्निंग, संगणक प्रशिक्षण, लोकसहभाग (CSR) इ. चा विचार या अंदाजपत्रकात करण्यात आलेला आहे. शालाबाह्य विद्यार्थ्यांसाठी निवासी सोय करुन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत.
- शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करुन भविष्यकाळात महापालिकेच्या शाळा शैक्षणिक दृष्टया प्रगत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.
- **बाला** – (शैक्षणिक उपक्रम) –
- पुणे महानगरपालिका शाळा इमारतींमधून मुलभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी सर्व्हे करण्यात आला आहे. Building As Learning Aid (BALA) याप्रमाणे शाळांना सुविधा देण्याचे प्रस्तावित आहे
- बालवाडयांसाठी स्वतंत्र नियोजन व प्रशिक्षण कार्यक्रम यावर भर देण्यात येणार आहे.

## माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका

### सन २०१७-१८

- पुणे महानगरपालिकेकडून इ. ८ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण माध्यमिक व तांत्रिक विभागाकडून मोफत दिले जाते व पुणे महानगरपालिका संचलित सर्व शाळांमध्ये मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाच्या मोफत संधी उपलब्ध करून दिल्या जातात. पुणे महानगरपालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या १८ अनुदानित व ४ विनाअनुदानित तसेच २ तंत्र शाळांपैकी १ अनुदानित, राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल, सहकारनगर, पुणे ९ ही इंग्रजी माध्यमाची शाळा व पुणे महानगरपालिका व थरमॅक्स सोशल इनिशिएटिव्ह यांचे संयुक्त विद्यमाने के.सी.ठाकरे इंग्लिश मिडीअम स्कूल आणि आकांक्षा फाऊंडेशन, टिच फॉर इंडिया यांचे संयुक्त विद्यमाने कै. विनोबा भावे, संत गाडगे महाराज, कै.बाबु जगजीवनराम, कै. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या ४ इंग्लिश मिडीयम स्कूल, खाजगी संस्था मार्फत ६ असे एकूण ३० माध्यमिक व तसेच ओम शिव फाऊंडेशन व पुणे महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने कला व वाणिज्य शाखेचे रात्र महाविद्यालय कार्यरत आहेत.
- **शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना** – पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील इ. १०वी व १२वी च्या अनुक्रमे ज्या विद्यार्थ्यांना ८५ टक्के व ८० टक्के पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५१०००/- रूपये दिले जातात. या वर्षी पुणे महानगरपालिका संचलित शाळांकडील इ. १०वी चे ५५ विद्यार्थी व १२वी चे ९६ विद्यार्थी तसेच राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल येथील विद्यार्थी असे एकूण १५१ विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ आरटीजीएस मार्फत देणे आवश्यक आहे. तथापि, या प्रकरणी तरतूद कमी असल्याने वर्गीकरणाचा प्रस्तावाची कार्यवाही सुरू असून दर विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यात येणार आहे.
- **NSQF (National Skill Qualification Framework)** अंतर्गत पुणे महानगरपालिका संचलित १० माध्यमिक विद्यालयांमध्ये सन २०१४-१५ मध्ये सदरची योजना इ. ९ वीसाठी सुरू करण्यात आली. सध्या २०१७-१८ मध्ये शैक्षणिक वर्षामध्ये इ. ९वी व १०वी माध्यमिक शाळांमध्ये हा उपक्रम सुरू असून हिंदी या विषयाऐवजी मल्टीस्कील व रिटेल हे २ विषय व्यवसाय अभ्यासक्रमात समाविष्ठ करण्यात आलेले आहेत. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षणाची प्राथमिक

ओळख होणार असून भविष्यामध्ये व्यवसाय शिक्षणाकडे जाण्याचा मार्ग सुकर होणार आहे. या वर्षामध्ये मध्ये आणखी ५ शाळांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे. सदरच्या योजने मध्ये लेव्हल १ ते २ मध्ये मल्टीस्कील व रिटेल यामध्ये १५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व या वर्षी लेव्हल ४ सुरु करण्यात आलेली आहे.

- **कला व क्रीडा स्पर्धा, विज्ञान भूगोल प्रदर्शन, छात्रसेना (स्काऊट), शैक्षणिक सहल, स्नेहसंमेलन** व इ. १०वी व १२वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ यांचे आयोजन शाळा पातळीवर सुरू आहेत.
- **मोफत गणवेश**– पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडील इ. ५वी ते १२वी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्यात येतात. सन २०१७–१८ या शैक्षणिक वर्षात या विद्यार्थ्यांसाठी गणवेश बाबतची कार्यवाही भांडार विभागाकडून डीबीटी च्या माध्यमातून करण्यात आली.
- **औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय)–** श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे टर्नर, फिटर, इलेक्ट्रीशियन, व ड्राफ्टसमन हे ४ ट्रेड असून २०० विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होत आहे. या ट्रेड साठी पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना प्राध्यान्याने प्रवेश दिला जातो. याचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्य काळात चरितार्थ चालविण्यासाठी होतो.
- या शैक्षणिक वर्षामध्ये सी.एस.आर अंतर्गत खालील नमूद केल्याप्रमाणे उपक्रम मोफत राबविले गेले. सी.एस.आर.च्या वतीने सुरू असलेली कामे –
- भारत फोर्ज कंपनी लि. यांचे वतीने महात्मा फुले माध्यमिक विद्यालय हडपसर पुणे ही प्रशाला दत्तक घेण्यात आली असून प्रशालेमध्ये अद्ययावत प्रकारची विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची मोठी टाकी यासाठी ३५ लाखापर्यंतची कामे करण्यात आली आहेत. तसेच विद्यार्थ्याची आरोग्य तपासणी करून आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.
- श्यामची आई फाऊंडेशनच्या वतीने सर्व विद्यालयांमध्ये इ. १०वी च्या विद्यार्थ्यासाठी मूल्य शिक्षण उपक्रम मोफत देणेत आले.
- स्टेट–अप फाऊंडेशनच्यावतीने विविध शाळांमध्ये जीवनमुल्य शिक्षण (समुपदेशन) प्रकल्प राबविण्यात आले. तसेच कास्प आणि नॉर्मा स्कूल वॉश प्रकल्पांतर्गत विविध शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि किरकोळ दुरूस्ती करून देण्यता आली आहेत.
- ग्रेट फाऊंडेशन, अगस्त्य फाऊंडेशन, विज्ञान आश्रम, इकोसान सर्व्हिसेस, सायन्स फॉर ऑल या सारख्या संस्थ्या कडून विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयाचे साहित्य, विज्ञान प्रयोग व विज्ञान विषयाचा प्रभावी अध्यापनासाठी योग्य ते सहकार्य घेणेत आले.
- **सॅनिटरी नॅपकीन – यावर्षी** (२०१७–१८) सह महापालिका आयुक्त, घनकचरा विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडून २३ शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकीन व्हेंडिंग मशिन बसविणेची कार्यवाही सुरू आहे.

## सन २०१८–१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- **मोफत पाठयपुस्तके –** इ.९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके बालभारती संस्थेकडून शाळा सुरू होण्याच्या १५ दिवस आधी खरेदी करणे विषयीची कार्यवाही करण्यात येईल. इ. १०वी च्या विद्यार्थ्यांना मोफत २१ अपेक्षित प्रश्न संचाची शासन निर्णयानुसार खरेदी भांडार विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल. प्रतिवर्षी पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडील इ. ५वी ते १२वी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्यात येतात. सन २०१८–१९ गणवेश बाबतची कार्यवाही भांडार विभागाकडून डीबीटी च्या माध्यमातून करण्यात येणार आहे.
- **११ वी व १२ वी द्विलक्षी अभ्यासक्रम –** राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई–लर्निंग स्कूल, सहकारनगर, पुणे ०९ ही इंग्रजी माध्यमाची शाळा ज्युनिअर केजी ते १२वी पर्यंत असून पुणे महानगरपालिकेच्या

शाळांमधून इ. १०वी मधून उत्तीर्ण झालेल्या ५० टक्के विद्यार्थ्यांना इ. ११वी द्विलक्षी अभ्यासक्रमासाठी मोफत प्रवेश देण्यात येतो. यामुळे गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना आयआयटी AIEEE मध्ये प्रवेश घेणे सुलभ होते.

- **शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना** – पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील इ. १०वी व १२वी च्या अनुक्रमे ज्या विद्यार्थ्यांना ८५% व ८०% पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु. ५१,०००/- दिले जातात. या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षामध्ये या योजनेचा लाभ तात्काळ देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

- **NSQF (National Skill Qualification Framework)** अंतर्गत पुणे महानगरपालिका संचलित १० माध्यमिक विद्यालयांमध्ये सन २०१४-१५ मध्ये सदरची योजना इ.९वी साठी सुरू करण्यात आली असून या योजनेमुळे विद्यार्थ्यांच्या बौध्दीक व व्यावसायिक गुणवत्तेमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदरचा उपक्रम सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये राबविणे आवश्यक आहे.

- **औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) –** श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे टर्नर, फिटर, इलेक्ट्रीशियन, व ड्राफ्टसमन हे ४ ट्रेड असून २०० विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होत आहे. या ट्रेडसाठी पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश दिला जातो. याचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्य काळात चरितार्थ चालविण्यासाठी होतो. सन २०१८-१९ मध्ये कोपा (कॉम्प्युटर प्रोग्रामर) वेल्डर व फॅशन डिझायनर हे तीन ट्रेड नव्याने सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

- सन २०१७-१८ प्रमाणेच सन २०१८-१९ मध्ये यापूर्वी सी.एस.आर.च्या वतीने सुरू असलेली कामे या शैक्षणिक वर्षात खाली नमूद केलेल्या संस्थेकडून सुरू ठेवणेचा मानस आहे. भारत फोर्ज कंपनी लि. यांचे वतीने महात्मा फुले माध्यमिक विद्यालय हडपसर पुणे ही प्रशाला दत्तक घेण्यात आली असून प्रशालेमध्ये त्यांचेकडून अद्ययावत प्रकारची विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याचे मोठी टाकी याविषयी दुरूस्ती कामे तसेच शाळांकडील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून आरोग्य विषयक कामकाज करून घेणेत येईल.

- गतवर्षाप्रमाणे श्यामची आई फाऊंडेशनच्या वतीने सर्व विद्यालयांमध्ये इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी जीवन मूल्य शिक्षण उपक्रम मोफत राबविण्यात येईल. स्टेट-अप फाऊंडेशनच्या वतीने विविध शाळांमध्ये जीवनमुल्य शिक्षण (समुपदेशन) प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

- कास्प आणि नॉर्मा स्कूल वॉश प्रकल्पाअंतर्गत विविध शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि किरकोळ दुरूस्ती कामे करून घेणार आहे. गेट फाऊंडेशन, अगस्त्य फाऊंडेशन, विज्ञान आश्रम, इकोसान सर्व्हिसेस, सायन्स फॉर ऑल या संस्थेकडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणारे शालेत्तर उपक्रम राबविण्याची कार्यवाही करण्याचा मानस आहे.

- **मोफत बसपास सुविधा** – मा. मुख्य सभा ठ.क्र. ४० दि. २०/०४/२०१५ ने पुणे महानगरपालिका हद्दीतील इ. ५वी ते १०वी पर्यंतच्या शहर निवासी विद्यार्थी व विद्यार्थीनींना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात पास देताना पुणे महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना मोफत व इतर शाळांतील विद्यार्थ्यांकडून पास देताना त्यांच्याकडून २५% रक्कम घेवून उरलेली ७५% रक्कम पुणे महानगरपालिकेकडून पीएमपीएमएल ला आदा करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. सन २०१७-१८ प्रमाणेच सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात सदरची योजना राबविण्यात येईल.

## (१७) सामान्य प्रशासन

**सन २०१७-१८**

- **पुणे महानगरपालिकेमध्ये "Aadhaar Enabled Bio-Metric Attendance System" ची सुरवात.**

पुणे महानगरपालिकेच्या कामकाजात गतीमानता येण्याकरीता यापुर्वी पुणे महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांची Bio-metric हजेरी पध्दत सुरू करण्यात आली आहे.

- **पुणे महानगरपालिकेमध्ये "File Tracking System" कार्यान्वित –**

  पुणे महानगरपालिकेत दि. १ नोव्हेंबर २०१७ पासून "File Tracking System" कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रथम टप्प्याच्या कार्यवाहीत सध्या आवक होणारी प्रकरणे व जावक होणारी प्रकरणे ऑनलाईन पाठवून त्याची मूळ नस्ती (Physical File) संबंधित खात्याकडे पाठविली जाते. परंतू आगामी काळात Physical File न पाठविता फाइल स्कॅन करुन ऑनलाइन पाठविण्यात येणार आहे. व अशा प्रकारे संपूर्ण प्रकारे पेपरलेस कामकाज व प्रकरणाची सद्यस्थिती ऑनलाइन त्वरित समजणे या दोन्ही गोष्टी साध्य होणार आहेत.

- **आपले सरकार पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा निपटारा –**

  आपले सरकार पोर्टलवर मनपाचे विविध खात्याशी संबंधित दाखल झालेल्या ३,८६४ नागरी तक्रारींपैकी ३,७५४ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. तक्रार निकाली काढण्याचे प्रमाण ९७% इतके आहे.

- **मा.पदाधिकारी व मा.नगरसेवक यांचे करिता प्रशिक्षण –**

  पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०१७ मध्ये निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित मनपा सभासदांसाठी मनपाच्या संपूर्ण कामकाजाविषयक यशदा, पुणे येथे दोन दिवसाची कार्यशाळा आयोजित करुन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**सन २०१८ –१९**

- **क्षेत्रीय कार्यालय स्तरावर हिरकणी कक्ष स्थापन करणे –**

  ज्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या मुख्य भवनामध्ये महिलांसाठी हिरकणी कक्ष स्थापित करण्यात आला आहे त्याच धर्तीवर मनपाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये महिलांसाठी नव्याने हिरकणी कक्ष स्थापन करण्यासाठी अर्थसंकल्पात र.रु. १०.०० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

- **File Tracking System पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणे –**

  पुणे महानगरपालिकेत दि. १ नोव्हेंबर २०१७ पासून " File Tracking System" कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रथम टप्प्याच्या कार्यवाहीत सध्या आवक होणारी प्रकरणे व जावक होणारी प्रकरणे ऑनलाईन पाठवून त्याची मूळ नस्ती (Physical File) संबंधित खात्याकडे पाठविली जाते. परंतू आगामी काळात Physical File न पाठविता, फाइल स्कॅन करुन ऑनलाइन अपलोड करुन पाठविण्यात येणार आहे व अशा प्रकारे संपूर्ण पेपरलेस कामकाज व प्रकरणाची सद्यस्थिती ऑनलाईन त्वरित समजणे या दोन्ही गोष्टी साध्य होणार आहेत.

- पुणे महानगरपालिकेच्या सर्व सेवकांची हजेरीसाठी बायोमेट्रिक प्रणालीचा अवलंब करून त्याची सांगड सेवकांना देय वेतनाशी घालण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे.

## (१८) <u>आपत्ती व्यवस्थापन विभाग</u>

### सन २०१८–१९ <u>(तरतूद रक्कम रुपये – रुपये १०.५० कोटी)</u>

- पुणे शहरात उध्दभवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती आणि मोठे अपघात यांना प्रतिसाद, शोध बचाव कार्य व नियंत्रण कक्ष संचलन इ. तातडीने करावयाच्या खर्चासाठी RE11R104 या बजेटहेडवर र.रु. ५०.०० लाख तरतूद करण्यात आली आहे.

- आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी सदर तरतुदीतुन क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकल ज्यामध्ये सर्च अ‍ॅन्ड रेस्क्यु करणाऱ्या यंत्रणे बरोबर, कम्युनिकेशन व प्रथोमपचार अशी यंत्रणा उपलब्ध असणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली आहे. सदर खरेदी करण्यात आलेल्या यंत्रणेसाठी ऑपरेशन व मेंटनन्स आणि संचालनाकरीता एकूण र.रु.१०.०० कोटी इतका खर्च येणार आहे. तरी FE17A190 या बजेट हेडवर र.रु.१०.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.
- एकविसाव्या शतकात जगातील विविध शहरांना भौतिक, सामाजिक आणि आर्थिक आव्हानांचा सामना करण्यासाठी अधिक रेसिलियन्ट (संवेदनक्षम आणि स्थितीस्थापकत्व) बनवण्यासाठी रॉकफेलर फाऊंडेशन यांनी १०० रेसिलियन्ट सिटीज या परियोजनेव्दारे जगभरातील १०० शहरांची निवड केली आहे. अतिशय विस्तृत अशा प्रक्रियेनंतर, पुणे शहराचा जगभरातील निवडक १०० शहरांमध्ये समावेश झाला आहे. या अनुषंगाने १०० रेसिलियन्ट सिटीज आणि पुणे महानगरपालिका यांच्या दरम्यान २०१७ साली सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारान्वये, पुणे शहराचे सिटी रेसिलियन्ट धोरण बनविण्यासाठी सिटी रेसिलियन्ट ऑफिसची स्थापना करण्यात आली असून, मुख्य रेसिलियन्स ऑफिसर यांची नेमणूक करण्यात आली आहे. सिटी रेसिलियन्ट ऑफिसद्वारे वेगवेगळ्या नागरी विषयांवर विस्तृत प्रमाणावर नागरिकांच्या आणि विविध क्षेत्रातील तज्ञांच्या सहभागाने सिटी रेसिलेन्स धोरण बनविले जाईल आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी १०० रेसिलियन्ट सिटीजच्या नेटवर्क मधील इतर शहरांची आणि संस्थांची मदत घेतली जाईल. या परियोजनेव्दारे पुणे शहराच्या पुढील विकासाला चालना देण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शहराचे स्थान उंचावण्यात देखील मदत होईल.

## (१९) <u>समाज विकास</u>

### सन २०१७–१८

- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी सन २०१४ पासून राबविणेत येत आहे. या योजनांकरीता शासनाकडून निधी प्राप्त होतो. या व्यतिरिक्त मनपा अर्थसंकल्पातील बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिला बाल कल्याण, ५% रक्कम मागासवर्गीयांसाठी व ३% रक्कम अपंगांसाठी राखून ठेवली जाते. खात्यामार्फत महिला बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, अपंग कल्याणकारी योजना, दिनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान इ. योजना राबविल्या जातात.
- **स्वयंरोजगार उपक्रम** – शहरी गरीबांना व्यवसाय प्रशिक्षण, उद्योजकता विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदान देण्यात येते.
- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी, क्षमता बांधणी व प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व नोकऱ्यांची उपलब्धता, स्वयंरोजगार कार्यक्रम, फेरीवाल्यांना सहाय्य, शहरी बेघरांना निवारा योजना शासनाच्या निधीतून राबविल्या जातात. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरिकांसाठी सेवा केंद्र, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्री करीता आधार केंद्र, पुणे महानगर समाज विकास संस्था यांचा समावेश आहे.
- **बचत गटांसाठी योजना** – शहर पातळीवर सुमारे १३,१०० बचत गट कार्यरत असून बचत गट स्थापनेसाठी महिलांना प्रशिक्षण, फिरता निधी, बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी प्रदर्शन व विक्री करीता अर्थसहाय्य, शेजार समुह गटातील स्वयंसेवकांना प्रशिक्षण, स्वस्त धान्याची दुकाने देणे, तसेच मनपाच्या प्राथमिक शाळेतील सुमारे ७०,००० विद्यार्थ्यांना शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत मध्यान्ह भोजन व बालवाडीतील १२,००० मुलांना बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो.

- **महिलांसाठी योजना –** विधवा महिलांना अनुदान, महिलांना कुटुंब नियोजनासाठी प्रोत्साहन, महिला सबलीकरण केंद्र, महिला/युवती यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण, मुलगी दत्तक योजना, वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनासाठी व्यवसाय प्रशिक्षण योजना, पाळणाघर, वस्तीपातळीवरील विविध प्रशिक्षण वर्ग व अनुदान, महिलांसाठी योगासन वर्ग इ. योजना राबविण्यात येतात.
- **विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना –** इ. १० वी व इ. १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लास फी अर्थसहाय्य, सीईटी क्लास फी अर्थसहाय्य, उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल करीता अर्थसहाय्य, कमवा व शिका योजना, इ. १० वी व इ. १२ वी मध्ये ८०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना अर्थसहाय्य, स्पर्धा परिक्षा केंद्र, मनपाच्या माध्यमिक प्रशालेतील मुलांना शैक्षणिक साहित्य इ. उपक्रम राबविले जातात.
- **भौतिक सुविधा उपक्रम –** झोपडपट्टीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरूस्ती, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इ. करीता मागासवर्गीय यांना अर्थसहाय्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील ४०० विद्यार्थ्यांचा भोजनाचा खर्च दिला जातो.
- **सामाजिक उपक्रम –** वृद्धांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसनमुक्तीसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी घरटं प्रकल्प, रात्र निवारा प्रकल्प, बाल विकास केंद्र इ. उपक्रम राबविण्यात येतात.
- **अपंग कल्याणकारी योजना –** अपंगांना मोफत पीएमपीएमएल बसपास, कृत्रिम अवयव घेणे, स्वयंरोजगार, उच्च शिक्षण, प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य, महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य, कुष्ठ पिडीत व १००% अतितीव्र अपंग (निःसमर्थ) व्यक्तीकरिता वार्षिक अर्थसहाय्य दिले जाते.
- सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षापासून पुणे महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये जेण्डर बजेटची अंमलबजावणी करणेत येत आहे.
- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत रोजगार मेळावा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, पुणे स्टेशन ते सावित्रीबाई फुले स्मारक गंज पेठ, पुणे पर्यंत भारत छोडो अभियान जनजागृती फेरी आयोजित करणेत आली होती.

### सन २०१८– २०१९

- समाज विकास विभागामार्फत वरील योजनांची अंमलबजावणी करणेत येते. या करीता तसेच नव्याने राबविणेत येणाऱ्या योजनांकरीता २०१८-२०१९ चे अर्थसंकल्पात रक्कम रू. १३१ कोटीची तरतूद सुचविणेत आली आहे.

**सन २०१८-२०१९ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील योजनांचे ऑडिट आणि सर्वेक्षण करणे.
- बार्टी संस्थेच्या मदतीने विविध व्यावसायिक प्रशिक्षण देणे.
- पुणे शहरातील रस्त्यांवरील मुलांकरिता मोबाईल स्कूल सुरू करणे.
- राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत महिलांसाठी विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम राबविणे.
- बेघर महिलांसाठी रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे.
- १५ क्षेत्रिय कार्यालय येथे हिरकणी कक्ष सुरू करणे.
- हॅलो माय फ्रेंड योजना राबविणे, युवकांच्या मानसिक आरोग्यासाठी कॉल सेंटर सुरू करणे.
- जेष्ठ नागरिकांना कायदा व सुरक्षिततेबाबत माहिती देणे.

- समाज विकास केंद्रामध्ये पाळणाघर सुरू करणे.
- दिव्यांग कल्याणकारी योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये दिव्यांगाना सुलभरित्या चलन वलनासाठी सोयी सुविधा निर्माण करणे.

## (२०) आर्थिक व्यवस्थापन

- पुणे महानगरपालिका ही महाराष्ट्रातील द्वितीय क्रमांकाची महापालिका असून महापालिकेचे पत मानांकन निश्चित करण्यासाठी मे. इंडिया रेटिंग अँड रिसर्च प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली होती. सन २०१५-१६ मध्ये महापालिकेस "IND AA/Stable" असे पत मानांकन/ Credit Rating प्राप्त झाले होते. सन २०१६-२०१७ मध्ये पुनःश्च पुणे मनपाचे पत मानांकन करण्यात आले. यात मनपाचा ताळेबंद, जमा खर्च, महापालिकेच्या मालमत्ता पुढील पाच वर्षाचे उत्पन्न व खर्चाबाबतचा आढावा तसेच पुणे महापालिकेची कर्जे व गुंतवणूका, पुणे महापालिका अंतर्गत सद्यस्थितीतील मोठे प्रकल्प व नियोजित भांडवली प्रकल्प, मनपाची आर्थिक सद्यस्थिती इ. विषयक माहितीचा अभ्यास संबंधित संस्थेमार्फत करण्यात आला व त्याआधारे मनपास भारतातील सर्वात चांगले IND AA+/Stable हे पत मानांकन प्राप्त झाले आहे. ज्याचा कर्जरोखे उभारताना महापालिकेस मोठयाप्रमाणात उपयोग झाला आहे. तसेच कर्जरोखे उभारण्यासाठी Dual Rating ची आवश्यकता असल्याने CARE Ratings Ltd. या संस्थेकडूनही पत मानांकन करुन घेतले असता त्यांचेकडूनही IND AA+/Stable हे पत मानांकन प्राप्त झाले.
- U.S. Department of Treasury, Office of Technical Assistance Government Debt and Infrastructure Finance यांचे समवेत Terms Of Reference, Work Plan तयार करण्यात आला व कर्जरोखे उभारणीसाठीचे कामकाज सुरु करण्यात आले. यासाठी SBI Capital Markets Limited यांची नेमणूक Technical Advisor cum Merchant Banker म्हणून करण्यात आली. SEBI या संस्थेने दिलेल्या मार्गदर्शन तत्वानुसार आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये पुणे महानगरपालिकेने २४ X ७ पाणीपुरवठा योजनेसाठी कर्जरोखे उभारणीची प्रक्रिया सुरु केली त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून र.रु.२,२६४.०० कोटी इतके कर्जरोखे उभारण्यास मान्यता प्राप्त झाली. यातील प्रथम टप्प्यासाठी र.रु. २००.०० कोटीचे कर्जरोखे ७.५९% इतक्या दराने उभारण्यात आलेले आहेत. पुणे महानगरपालिकेस भारतातील कर्जरोखे उभारणारी पहिली महानगरपालिका म्हणून गौरविण्यात आले आहे.
- पुणे महानगरपालिकेमध्ये ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या विविध खात्यांमध्ये ERP प्रणाली राबविण्याचे कामकाज सुरु करण्यात आले आहे. त्या अंतर्गत Finance, Material Management, Document Management System चे काम सुरु करण्यात आले आहे.

# अ)दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक–

## प्रमुख जमा बाबी :–

### (१) स्थानिक संस्था कर

**सन २०१७–१८**

- मे. केंद्र व राज्य शासनाने दि.०१/०७/२०१७ पासून वस्तु व सेवाकर (GST) लागू केला असून त्यामुळे स्थानिक संस्था कर बंद करण्यात आलेला आहे व पुणे महानगरपालिकेस वस्तु व सेवाकर (GST) भरपाईपोटी माहे जुलै २०१७ पासून दरमहा **र.रु. १३७.३० कोटी** अनुदान देण्यात येत आहे.
- माहे एप्रिल २०१७ ते २० डिसेंबर २०१७ अखेर स्थानिक संस्था कर कार्यालयाकडे एकूण **र.रु. १,२८३.१५ कोटी** उत्पन्न प्राप्त झाले आहे.
- सन २०१७–२०१८ या आर्थिक वर्षामध्ये स्थानिक संस्था करापोटी व वस्तु व सेवाकर (GST) भरपाई अनुदानापोटी अंदाजे एकूण **र.रु. १,७५४.०० कोटी** उत्पन्न प्राप्त होणार आहे.
- **सन २०१७–१८ या आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाची माहिती (आकडे कोटीमध्ये)**

| अ.क्र. | जमेबाबतचा तपशील | उत्पन्न |
|---|---|---|
| १ | मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेले उद्दीष्ट | १७३०.०० |
| २ | मा. मुख्य सभा यांनी दिलेले उद्दीष्ट | १७३०.०० |
| ३ | दि. १/०४/२०१७ ते दि. ३१/१२/२०१७ अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न | १२८३.४२ |
| ४ | दि. ०१/०१/२०१८ ते दि. ३१/०३/२०१८ अखेर संभाव्य प्राप्त होणारे उत्पन्न GST (वस्तु व सेवाकर) पोटी सुमारे र.रु.१३७.३० कोटी इतके शासकीय अनुदान दरमहाप्रमाणे मे. राज्य शासनाकडून प्राप्त होणार आहे. (र.रु. ४११.९० कोटी) + मे. राज्य शासनाकडून १ टक्का मुद्रांकशुल्क अधिभारापोटी येणे असलेले उत्पन्न (र.रु. ६० कोटी) | ४७१.९० |
| ५ | माहे एप्रिल २०१७ ते माहे मार्च २०१८ अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न व संभाव्य उत्पन्न | **१७५५.३२** |

- **सन २०१८–१९ या आर्थिक वर्षात जमा रकमेचा अंदाज.**

| तपशील | सन २०१८–१९ अपेक्षित उत्पन्न |
|---|---|
| मे. राज्य शासनाच्या दि. २०/५/२०१७ रोजीच्या राजपत्रानुसार मागील वर्षाच्या सरासरी उत्पन्नात ८% वाढ धरुन जीएसटी (वस्तु व सेवा कर) पोटी सुमारे र.रु.१४८.२८ इतके शासकीय अनुदान दरमहा मे. राज्य शासनाकडून प्राप्त होणार आहे. (र.रु. १४८.२८ X १२ महिने) | **१८८२.०० कोटी** |

### (२) मिळकत कर

**सन २०१७–१८**

**उद्दीष्ट र.रु. १८१६.०० कोटी**

- जीआयएस/जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणाचे काम पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सुरु करण्यात आले आहे. मिळकतीचे सर्वेक्षण व जीआयएस करणेकामी मिळकतीमधील वापरातील बदल, वाढीव

बांधकाम, करआकारणी न झालेल्या मिळकती तसेच जीपीएस अक्षांश व रेखांश, मिळकतीची छायाचित्रे, इत्यादी स्वरुपाची माहिती गोळा करण्याचे Saar IT Resourses Pvt Ltd., Mumbai व Cyber Tech Systems and Software Ltd., Thane या कंपन्यांना देण्यात आले असून त्यांनी खालीलप्रमाणे कामाची पुर्तता केली आहे.

- सुमारे ८,३४,४७९ कर आकारणी झालेल्या मिळकतीपैकी ४,११,५२५ म्हणजे ४९.३२% मिळकतीचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.
- यामध्ये वापरात बदल २,४४५ मिळकती, वाढीव बांधकाम २०,८३७ मिळकती, भाडेकरी वापर २६,३१२ मिळकती, करआकारणी न झालेल्या २६,१०१ मिळकती, इतर ६,१०९ मिळकती याप्रमाणे ८१,८०४ मिळकतीपासून सुमारे र.रु. ९०,६०,६७,३९७/- इतकी मागणी वाढली असून त्यापैकी सुमारे र.रु. ३०,९१,०८,८४७/- इतकी वसुली करण्यात आली आहे.
- सवलतीच्या दराने मिळकतकर भरण्याच्या कालवधीत म्हणजेच दि. १/०४/२०१७ ते ३०/०६/२०१७ अखेर पहिल्या तीन महिन्यात मिळकतकरापोटी र.**रू. ६७२.६४ कोटी** इतकी जमा झाली आहे.
- सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये दि.१/०४/२०१७ ते ३०/०६/२०१७ अखेर ऑनलाईन व ऑफलाईन संपूर्ण मिळकतकर भरणाऱ्या एका क्षेत्रीय कार्यालयाकडील १० मिळकतदार याप्रमाणे १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील सुमारे १५० मिळकतदारांना ऑनलाईन लकी ड्रॉ दि. १५/०८/२०१७ रोजी काढण्यात आला असून प्रत्येक भाग्यवान विजेत्यास र.रु.१५,००० याप्रमाणे १५० मिळकतदारांस र.रू. २२,५०,०००/- इतकी रक्कम त्यांचे मिळकतकराच्या खात्यावर जादा जमा करण्यात आली आहे. सदरची रक्कम पुढील वर्षाचे करापोटी समायोजीत करण्यात येणार आहे.
- मिळकतकराच्या डेटाबेसमध्ये सुमारे ७,११,५४९ भ्रमणध्वनी क्रमांक व सुमारे ४,०६,२६६ ईमेल आयडी समाविष्ठ केलेले असून ईमेल व भ्रमणध्वनी क्रमांकावर सन २०१८-१९ मधील मिळकतकर विषयक मागणीची रक्कम मुदतीत भरणेबाबत ई-मेलव्दारे बिले पाठविणे व मोबाईलव्दारे एसएमएस पाठविण्यात येणार आहे.
- मिळकतकराची रक्कम जास्तीत जास्त ऑनलाईन स्विकारणेबाबत खात्याकडून प्रोत्साहन देण्यात आले असून सन २०१६-२०१७ मध्ये ऑनलाईन कलेक्शन १८.९६% इतकी होते तेच कलेक्शन सन २०१७-२०१८ मध्ये ४२.९०% इतक झाले असून ऑनलाईन कलेक्शन मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ४५% इतकी वाढ झाली आहे.
- कॅशलेस प्रॉपटी टॅक्स करणेच्या माध्यमातून जास्तीत जास्त मिळकत धारकांनी ऑनलाईन कराची रक्कम भरण्यासाठी सर्व ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याने नागरीकांना कर भरण्यासाठी रांगेत उभे राहावे लागणार नसून नागरीकांचा बहुमूल्य वेळेची बचत होणार आहे.

## सन २०१८-१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक- उद्दीष्ट र.रु. १८१०.१४ कोटी

- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता मिळकतकराचे विविध करामध्ये (सर्वसाधारण कर ४%, सफाई कर ४.५०%, अग्निशामक कर ०.५०%, जललाभ कर १.२५%, जलनिस्सारणलाभकर २.५०%, मनपा शिक्षणकर २.२५%) १५% दरवाढ सुचविण्यात आलेली असून त्यामुळे उत्पन्नामध्ये सुमारे १३५ कोटी वाढ होणार आहे. मा. मुख्यसभा ठराव क्रमांक ८०९, दि.१६/०२/२०१६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन म्हणजेच सन २०१७-१८ सालासाठी मिळकत करावरील पाणीपट्टीसाठी १५% दरवाढ करणेत आली आहे. सदर करपात्र रकमेच्या प्रमाणातील दरवाढीनुसार पाणीपट्टीत सुमारे र.रु. २०.०० कोटी वाढ होणार आहे.
- विविध करातील १५% दरवाढ करता तसेच मागील थकबाकीच्या (कोर्टकेसची, दुबार देयके, शून्य करावयाच्या मिळकती इ. रक्कम विचारात घेवून) ४०% व सन २०१७-१८ ची मागणी विचारात घेवून त्यामध्ये १५% नवीन तयार होणारी मागणी वाढवून सदर रकमेच्या ८०% वसूली अपेक्षीत धरून तसेच

पाणीपट्टीचे दरातील १५% वाढीने सुमारे र.रु. २०.०० कोटी व विविध कराचे १५% दरवाढीने र.रू. १३५.०० कोटी विचारात घेता तसेच सन २०१८-२०१९ मध्ये मिळकतकरापोटी सुमारे र.रु. १,८१०.१४ कोटी इतकी वसूली अपेक्षीत आहे.

- सुमारे ८,५०,००० मिळकतीपैकी निम्म्या मिळकतीचे सर्वेक्षण व जीआयएस झाले असून उर्वरित मिळकतीचे सर्वेक्षण व जीआयएस पूर्ण करून करआकारणी न झालेल्या व वापरात बदल, वाढीव बांधकाम झालेल्या अन्य मिळकतीचेही सर्वेक्षण व जीआयएस पूर्ण करणेबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

## (३) बांधकाम परवानगी व विकास शुल्क

### सन २०१७-१८

- **बांधकाम परवानगी व विकास शुल्क** - सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता सद्यस्थितीतील बांधकाम क्षेत्रातील कल, प्रस्ताव संमतीकरण व जमा महसूल यांचा ताळमेळ पाहता बांधकाम विकास विभागाकडील जमा महसूलचे रु.१,१६५.०५ कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे जमेचे उद्दीष्ट साध्य झाले नाही. डिसेंबर २०१७ अखेर सुमारे र.रू.३३९.८८ कोटी जमा झालेले आहेत. तसेच ३१ मार्च २०१८ अखेर पर्यंत एकुण र.रु.४५०.०० कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

### सन २०१८-१९ (उद्दिष्ट र.रू.७५० कोटी)

- सन २०१८-२०१९ या अंदाजपत्रकीय वर्षात जमा महसुल र.रु. ७५०.०० कोटी अपेक्षित आहे. तसेच ऑनलाईन ॲटोडीसीआर (Auto DCR) जलदगतीने बांधकाम परवानगीची कार्यपध्दती अवलंबून सदरचे उद्दिष्ट पुर्ण करणे शक्य होणार आहे. पुणे मनपा हद्दीसाठी मंजूर करण्यात आलेल्या सुधारीत विकास नियंत्रण व प्रोसाहन नियमावली २०१७ मध्ये नव्याने प्रिमियम, एफ.एस.आय.ची संकल्पना मांडण्यात आली असून या नियमावली नुसार प्रिमियम एफ.एस.आय., आय.टी./आय.टी.एस. इ. इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस.आय. व विशेष इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस.आय. पोटी प्रिमियम जमा होणार असल्याने सदर उद्दीष्ट गाठणे शक्य होणार आहे.

## (४) पाणीपट्टी

### सन २०१७-१८

- मीटरवरील दि. १५/०१/२०१८ अखेर एकूण नळजोड संख्या ४२,९५३ इतकी असून, थकबाकी सुमारे र.रू.५०२.६३ कोटी आहे. थकबाकीची प्रमुख कारणे दुबार पाणीपट्टी, नादुरुस्त मीटर बंद असल्याने, नळजोड बंद घोषित झोपडपट्टीमधील पाणीपट्टी, रस्ता रूंदरकरणामधील नळजोड इ. कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची अवाजवी थकबाकी आलेली आहे. सध्याचे पाण्याचे मीटर्स बसविण्याची जबाबदारी संबंधीत ग्राहकाची आहे. तसेच सदर मीटर मेकॅनीकल तंत्रज्ञानाचे असल्याने वारंवार नादुरूस्त होत आहे. सध्याच्या सुमारे ४९% मीटर नादुरूस्त आहेत व नादुरूस्तीच्या काळात सरासरी वापरापेक्षा जादा वापर गृहित धरून बिलाची आकारणी करण्यात येते व मीटर दुरूस्त केल्यानंतर सदर बिलाची दुरूस्ती करण्यात येते. बिल दुरूस्तीची कार्यवाही खात्यामार्फत करण्यात येत असून, बिल दुरूस्तीनंतर वसूली होणारी रक्कम ही २० ते २५% इतकी असून, अवाजवी थकबाकी निरस्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये मे. कोर्टामार्फत तीन वेळा लोक अदालत राबविण्यात येऊन अंदाजे र.रु. ८.०० कोटी थकबाकी वसूल करण्यात आली आहे.

* सन २०१७-१८ करीता टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) पाणीपट्टी दरास मा. मुख्य सभा ठ. क्र. ५९८, दि.१२/०२/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मीटरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठयाची पाणीपट्टी दरवर्षी सरासरी अंदाजे र.रु.६५.०० ते ६७.०० कोटी इतकी जमा होते. सन २०१७-१८ या अर्थिक वर्षामध्ये दि. १५/०१/२०१८ अखेर र.रु.७०.०४ कोटी इतकी जमा झालेली आहे.

| अ. क्र. | वर्ष | वसुली (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | ६७.८७ |
| २ | २०१३-१४ | ६७.८५ |
| ३ | २०१४-१५ | ५८.०३ |
| ४ | २०१५-१६ | ७१.६७ |
| ५ | २०१६-१७ | ९३.९३ |
| **६** | **२०१७-१८** | **७०.०४ (१५.१.२०१८ पर्यंत)** |

* घरगुती व बिगर घरगुतीच्या मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) दरवाढ मा.मुख्य सभा ठराव क्र. २२७७, दि.५/०२/२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे. यामुळे पाण्याचा कमी वापर करणाऱ्या नळजोड धारकांना कमी दराने बिल व पाण्याचा जादा वापर करणाऱ्या नळजोड धारकांना जादा दराने बिलांची आकारणी करण्यात येणार आहे. यामुळे पाणी वापरावर परिणाम होणार असून पाणी वाया जाण्याचे प्रमाणे कमी होणे अपेक्षित आहे. तसेच या वाढीव मीटर पाणीपट्टीमुळे पाणीपुरवठा करणेसाठी होणारा खर्च भरून काढणे शक्य होणार आहे.

## सन २०१८-१९ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक (उद्दिष्ट र.रू.१८५.०० कोटी)

* सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये शहरातील अनधिकृत नळजोड शोधून त्यावर कारवाई करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणे वेळोवेळी लोकअदालतचे आयोजन करून थकबाकीदारांकडून रक्कम वसूल करण्याबाबतची मोहिम सुध्दा राबविण्यात येणार आहे. समान पाणी वाटप योजनेमध्ये अल्ट्रासोनीक/इलेक्ट्रोमॅग्नेटीक पध्दतीचे मीटर बसविण्यात येणार असल्याने मीटर नादुरूस्तीचे प्रमाण कमी होऊन थकबाकी कमी होण्यास मदत होणार आहे.

**वापरानुसार दर आकारणी**

| सध्याचे दर | | प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|
| खप कि.लि./महिना | दर (सन २०१७) | खप कि.लि./महिना | दर (सन २०१८) |
| **झोपडपट्टी** | | | |
| कच्ची झोपडी | ३८.३/महिना | कच्ची झोपडी | ४०.२२/ महिना |
| पक्की झोपडी | ६३.८/महिना | पक्की झोपडी | ६६.९९/ महिना |
| **घरगुती पाणी वापर दर** | | | |
| ० ते १८.६० | ५.७८ | ० ते १८.६ | ६.०७ |
| १८.६० ते ३० | ९.६६ | १८.६ ते ३० | १०.१४ |
| ३० ते ३७.५ | १९.२२ | ३० ते ३७.५ | २०.१८ |
| ३७.५ पेक्षा जास्त | २८.८८ | ३७.५ पेक्षा जास्त | ३०.३२ |
| **बिगर घरगुती वापर दर** | | | |
| ० ते २० | ४९.९८ | ० ते २० | ५२.४८ |
| २० ते ४० | ५१.८७ | २० ते ४० | ५४.४६ |
| ४० ते ६० | ५४.५० | ४० ते ६० | ५७.२३ |
| ६० पेक्षा जास्त | ६२.७९ | ६० पेक्षा जास्त | ६५.९३ |

## (५) आकाशचिन्ह परवाना

**सन २०१८-१९**

- पुणे शहर हद्दीमध्ये उभारण्यात येणाऱ्या जाहिरात फलकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २४४, २४५ तसेच जाहिरात व फलक नियंत्रण नियम २००३ अन्वये जाहिरात फलकास नवीन परवानगी व जाहिरात फलक नुतनीकरण परवानगी देणेत येते. तसेच अधिनियमाचे कलम ३१३ अन्वये वीज, पाणी, वाफ यावर चालविण्यात येणाऱ्या व्यवसायास मशिनरी परमिट व अधिनियमाचे कलम ३७६ अन्वये ज्वलनशील पदार्थाचा साठा करणेकामी साठा परवाना देण्यात येणार आहे.
- पुणे शहर हद्दीतील नागरीक दुकानदार, व्यवसायीक यांचे नावे असणाऱ्या व्यवसायाच्या ठिकाणी एकापेक्षा जास्त लावण्यात येणाऱ्या नामफलकाचे शुल्क आकारणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिली असून याबाबत क्षेत्रिय कार्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
- परवाना व आकाशचिन्ह विभागमार्फत सन २०१८-२०१९ करिता पुणे शहरातील हददीतील जाहिरात फलकांचे 'अ' व 'ब' अशी वर्गवारी करण्यात येणार आहे. 'अ' बर्गातील अंदाजे ६०० जाहीरात फलकाकरीता र.रु.५००/- प्रति स्केअर फुट व 'ब' वर्गातील अंदाजे ११४९ जाहीरात फलकाकरीता र.रु.४५०/- प्रति स्केअर फुट दर निश्चित केल्यास अपेक्षित वार्षिक उत्पन्न अंदाजे र.रु.५८.०० ते ६०.०० कोटी होईल.
- पुणे मनपा कार्यक्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गांवामधील जाहिरात फलक, परमिट, परवाना यांचे सर्वेक्षण करण्याकरिता पुरेसे मनुष्यबळाची आवश्यकता असते यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास अपेक्षित उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

**सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.**

*(आकडे रुपये कोटीत)*

| **जमा बाजू** | | |
|---|---|---|
| **अर्थशिर्षक** | **२०१७-१८ साठीचे जमेचे उद्दीष्ट** | **माहे डिसेंबर २०१७ अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरवातीची शिल्लक | ०.०२ | ० |
| स्थानिक संस्था कर | १७३०.४० | ६३५.६६ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ० | ८२३.८० |
| मिळकतकर | १४३३.६० | ६०७.४७ |
| पाणीपट्टी | ३७९.६७ | १४९.५६ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ११६५.०५ | ३२९.१२ |
| इतर जमा | ७१६.६६ | २९८.३६ |
| अमृत व स्मार्ट सिटी अभियान अनुदान | ० | ३९.९० |
| शासकीय अनुदान | २८६.६० | ७९.३९ |
| कर्ज / कर्जरोखे | २००.०० | २००.०० |
| **एकूण रक्कम रुपये** | **५९१२.००** | **३१६३.२६** |

## (ब) दृष्टीक्षेपात सन २०१८-१९ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज-

**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येतआहे.**

*(आकडे रूपये कोटीत)*

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | १६५०.०० |
| स्थानिक संस्था कर | -२.९५ | वीज खर्च व दुरूस्ती | २४४.२० |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | १८८२.०० | पाणी खर्च | ३१.३० |
| मिळकतकर | | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ४८.६५ |
| विकास शुल्क | १६१९.९१ | औषधे, पेट्रोल/डिझेल | ११०.७२ |
| पाणीपट्टी | ७५०.०० | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | १०५५.३४ |
| शासकीय अनुदान | ३३९.९० | वॉर्डस्तरीय | ३४.४० |
| इतर जमा | २९९.१३ | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ८४.४१ |
| कर्ज/रोखे | ४६२.०१ | | |
| प्रधानमंत्री आवास योजना | ० | भांडवली व विकासाची कामे | २००१.४६ |
| | ४६.९८ | अमृत व स्मार्ट सिटी अभियान अनुदान | १३६.५० |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकूण** | **५३९७.००** | **एकूण** | **५३९७.००** |

लोकशाहीमध्ये लोककल्याणकारी योजनांचा अत्युच्च प्राधान्य असते. स्थानिक स्वराज्य संस्था या शासन व नागरिक यामधील महत्वाचा दुवा म्हणून भूमिका पार पाडीत असतात. नागरिकांच्या जन्मापासून म्हणजेच जन्मदाखला व मृत्यूपर्यंत म्हणजेच मृत्यूदाखला अशा संपूर्ण जीवन कालचक्रात सर्व मुलभूत नागरी सोयीसुविधांशी स्थानिक स्वराज्य संस्था निगडीत असते. प्रशासनाकडून विधायक प्रतिसाद मिळावा, अशी नागरिकांची अपेक्षा असते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेवर सुप्रशासन, पारदर्शीपणा, गतीमानता या सर्व महत्वाचे व जिव्हाळयाचे विषयांच्या अपेक्षांची बांधिलकी निर्माण होते आणि त्याची अंतिमत: पूर्तता करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा अहोरात्र कार्यरत असते. प्रशासनाकडून सार्वजनिक सुधारणा होत असताना विविध स्तरातून मतमतांतरे /मतभिन्नता असलीतरी अंदाजपत्रकाच्या माध्यमातून सर्व पातळयांवर अत्यावश्यक व विकास कामांची अंमलबजावणी करण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केला जातो. शहराचा सर्वांगिण विकास साधण्याची मनोकामना व्यक्त करुन विकासाच्या संकल्पनांची बांधिलकी व शहराच्या विकासाची दिशा निश्चित करुन अंदाजपत्रक सादर करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. सर्व पक्षनेते, मा. सर्व पदाधिकारी, मा. प्रभाग समिती अध्यक्ष, मा. सर्व सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व सर्व Print Media व Electronic Media मधील मा. संपादक, बातमीदार, प्रतिनिधी यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले, त्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे!

सर्व संबंधित मा. केंद्रातील व राज्यातील माननीय मंत्री महोदय, मा. संसद सदस्य, मा. विधी मंडळ सदस्य, केंद्र व राज्य शासनाचे तज्ञ मार्गदर्शक यांचेही मोलाचे सहकार्य असून, त्या सर्वांची मी कृतज्ञता व्यक्त करतो! शहरातील विविध विकासाची कामे करताना सर्व नागरिकांचे समाधान करणे व त्यांच्या व्यक्त होणाऱ्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रकात सर्वांगाने विचार करण्यात आला आहे. हे अंदाजपत्रक तयार करताना ज्यांनी मोलाचे सहकार्य केले आहे, त्या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे!

अंदाजपत्रकाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करताना सर्वांचे सहकार्य मिळेल या विश्वासासह मी आज दिनांक २२.०१.२०१८ रोजी पुणे महानगरपालिकेतील माझे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

**(कुणाल कुमार)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

दिनांक : २२/०१/२०१८